❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती **सोमवार, दि. २६ ऑक्टोबर २०२६** ❖ पाने : ८ ❖ अंक : ३०० ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



थोडक्यात...

गॅस जोडण्यांना गती; ३१ मार्च पर्यंत मुदतवाढ

मुंबई : दैनिक संध्या

राज्यात घरगुती पाइप गॅस (PNG) जोडण्यांचे काम वेगाने पूर्ण व्हावे, यासाठी राज्य सरकारने गॅस कंपन्यांना दिलेल्या विविध सवलतींची मुदत ३१ मार्च २०२७ पर्यंत वाढवली आहे. यामध्ये परवानग्या २४ तासांत देणे, काही शुल्क माफ करणे आणि २४ तास काम करण्याची परवानगी देणे अशा सवलतींचा समावेश आहे. राज्यातील स्वयंपाकाच्या गॅसच्या सुलभ वितरणासाठी पाइपद्वारे नैसर्गिक वायू (PNG) वितरणाला गती मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार व केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील सिटी गॅस डिस्ट्रिब्युशन (CGD) नेटवर्कचा जलद आणि वेगवान विस्तार करण्यात येत आहे. यासाठी राज्य सरकारने ईज ऑफ डुइंग अंतर्गत परवाने देणे सुलभ केले असून काही परवान्यांच्या शुल्क माफीसह अनेक महत्त्वपूर्ण सवलती घोषित केल्या आहेत. गॅस कंपन्याना या सवलती यापूर्वी ३० जून २०२६ पर्यंत देण्यात आल्या होत्या. आता यामध्ये मुदतवाढ देण्यात आली असून आता या सवलती ३१ मार्च २०२७ पर्यंत लागू राहणार आहेत. यासंदर्भातील शासन निर्णय नगर विकास विभागाने जारी केला आहे. जागतिक भू-राजकीय परिस्थितीमुळे ऊर्जा पुरवठा साखळीवर परिणाम झाल्याने एलपीजी उपलब्धतेवर मर्यादा येत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यात पाइपद्वारे नैसर्गिक वायू (PNG) जोडण्यांचा विस्तार गतीने करण्यासाठी नगर विकास विभागाने सर्व महापालिका व नगरपालिकांसाठी सूचना निर्गमित केल्या आहेत.

चारा लागवडीतून ग्रामीण रोजगाराला चालना

मुंबई : दैनिक संध्या

राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चाऱ्याची टंचाई भासू नये आणि ग्रामीण भागातील मजुरांच्या हाताला शाश्वत काम मिळावे, यासाठी राज्य शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण)' अंतर्गत वैयक्तिक तसेच ग्रामपंचायत व सार्वजनिक जमिनीवर चारा पिकांच्या लागवडीसाठीच्या सविस्तर अंदाजपत्रकास शासनाने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे राज्यातील दुष्काळसदृश तालुक्यांसह ग्रामीण भागातील पशुपालकांना हिरवा चारा मिळण्यास मोठी मदत होणार असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळेल, अशी माहिती रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी दिली. वैयक्तिक जमिनीवर ७ हजार ४९० रोपांच्या चारा लागवडीसाठी एकूण १ लाख २१ हजार ८१५ रुपयांचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले आहे. यामध्ये २४५ मनुष्य दिवसांच्या मजुरीसाठी ७७ हजार ६६५ रुपये आणि साहित्य खर्चासाठी ४४ हजार १५० रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामपंचायत हद्द, गावठाण तसेच विहिरीजवळील अन्य उपलब्ध जागेवर एक एकर चारा लागवडीसाठी एकूण १ लाख ५५ हजार ३ रुपयांचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले.

महाराष्ट्र जागतिक दागिने उत्पादन व निर्यातीचे केंद्र बनेल

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : महापे येथे 'इंडिया ज्वेलरी पार्क, मुंबई' प्रकल्पाचा शुभारंभ

बदलत्या जागतिक व्यापाराशी जुळवून घेण्याचे आवाहन

जागतिक स्तरावरील बदलती परिस्थिती आणि अमेरिका व चीनसारख्या मोठ्या बाजारपेठांमधील घडामोडींमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारासमोर नवी आव्हाने निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत उद्योगांनी बदलत्या बाजारपेठांचा अभ्यास करून आधुनिक तंत्रज्ञान, उत्पादनातील नावीन्य आणि निर्यातीच्या नव्या संधींचा स्वीकार करणे आवश्यक आहे. इंडिया ज्वेलरी पार्क या बदलांना सामोरे जाण्यासाठी दागिने उद्योगाला आधुनिक व्यासपीठ उपलब्ध करून देईल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.



■ ठाणे (दै. संध्या)

मुंबई आणि महाराष्ट्राची व्यावसायिक क्षमता, कुशल मनुष्यबळ, सुरक्षित औद्योगिक वातावरण आणि उद्योजकतेची परंपरा यांच्या बळावर महाराष्ट्राला जागतिक स्तरावरील दागिने उत्पादन व निर्यातीचे प्रमुख केंद्र बनविण्याची क्षमता आहे. बदलत्या जागतिक व्यापार परिस्थितीशी जुळवून घेत आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि शासन आणि उद्योगाच्या माध्यमातून 'इंडिया ज्वेलरी पार्क, मुंबई' हा प्रकल्प दागिने उद्योगाच्या भविष्यातील विकासाचा महत्त्वपूर्ण केंद्रबिंदू ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला. नवी मुंबईतील महापे येथील टीटीसी औद्योगिक क्षेत्रात 'इंडिया ज्वेलरी पार्क, मुंबई' प्रकल्पाच्या शुभारंभप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वनमंत्री गणेश नाईक, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बळगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र कुशवाह, रत्न व आभूषण निर्यात प्रोत्साहन परिषदेचे अध्यक्ष किरीट भन्साळी, उपाध्यक्ष शौनक पारिख आदी मान्यवर उपस्थित होते. मुंबई आणि महाराष्ट्राची व्यावसायिक क्षमता, कुशल मनुष्यबळ आणि व्यावसायिकतेची जागतिक स्तरावर ओळख आहे. रत्न व आभूषण उद्योगासाठी आवश्यक असलेले कुशल कारागीर, उद्योजकता, व्यापाराचे अनुभवसंपन्न जाळे आणि अनुकूल औद्योगिक वातावरण ही महाराष्ट्राची बलस्थाने आहेत. या सामर्थ्याचा उपयोग करून राज्याला जागतिक दागिने उद्योगातील महत्त्वाचे केंद्र बनविण्याची संधी इंडिया ज्वेलरी पार्कच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. महापे येथील २२ एकर क्षेत्रावर अत्याधुनिक दागिने उत्पादन केंद्र विकसित करण्यात येत आहे. हा प्रकल्प उद्योगाच्या दीर्घकालीन विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरेल. आजपासून ३० ते ४० वर्षांनंतर मागे वळून पाहताना इंडिया ज्वेलरी पार्कच्या उभारणीसाठी प्रयत्न करणाऱ्या उद्योग क्षेत्रातील नेतृत्वाचे निश्चितपणे स्मरण केले जाईल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी नमूद केले. उद्योग उभारणीसाठी केवळ जमीन उपलब्ध करून देणे पुरेसे नसून, वीज, पाणी, रस्ते, भांडवल, पायाभूत सुविधा आणि विविध विभागांच्या परवानग्या वेळेत मिळणे आवश्यक आहे. इंडिया ज्वेलरी पार्कच्या कामात कोणत्याही अडचणी आल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी तत्परतेने मदत करावी. प्रकल्पाचे काम वेगाने पूर्ण करण्यासाठी शासनाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य दिले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली. उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी शासन आणि उद्योग यांच्यातील समन्वय व भागीदारी महत्त्वाची आहे. उद्योगांच्या गरजा समजून घेऊन आवश्यक सुविधा आणि प्रशासकीय सहकार्य उपलब्ध करून देण्याची शासनाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्याचा संकल्प केला आहे. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी उत्पादन, निर्यात, रोजगारनिर्मिती आणि उद्योजकता यांची भूमिका महत्त्वपूर्ण असेल. भारत पाच ट्रिलियन अमेरिकन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करत असताना महाराष्ट्रही एक ट्रिलियन अमेरिकन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्नशील आहे. इंडिया ज्वेलरी पार्कसारखे प्रकल्प या आर्थिक वाटचालीला बळ देतील, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. इंडिया ज्वेलरी पार्क प्रकल्पामुळे सुमारे २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपात एक लाख रोजगारांच्या संधी निर्माण होतील. महापे येथील २२ एकर क्षेत्रावर उभारण्यात येणारे हे अत्याधुनिक दागिने उत्पादन केंद्र महाराष्ट्राला जागतिक स्तरावरील रत्न व आभूषण उत्पादन, व्यापार आणि निर्यातीचे प्रमुख केंद्र बनविण्यास महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी समन्वयाने काम करा

■ मुंबई (दै. संध्या)

■ मंत्री अतुल सावे : यशदामध्ये महात्मा फुले यांच्या द्विजन्मशताब्दीनिमित्त दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिराला प्रारंभ



शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्यांचा लाभ समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे. प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता राखून योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक करण्यावर भर द्यावा,असे प्रतिपादन इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री तथा 'वनार्टी'चे अध्यक्ष अतुल सावे यांनी केले.

पुणे यशदा येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त इतर मागास बहुजन कल्याण विभाग आणि स्व. वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय निवासी प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मंत्री श्री. सावे बोलत होते. यावेळी भटके-विमुक्त विकास परिषद, महाराष्ट्राचे अध्यक्ष उद्धवराव काळे, इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासो धुळाज, 'वनार्टी'चे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे, राज्यस्तरीय अशासकीय सदस्य राजेंद्र दोनाडकर, डॉ. संजय पुरी, नरेश पोटे, शरद माकर यांची प्रमुख उपस्थिती होती.इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे अशासकीय सदस्य, विभागाचे क्षेत्रीय अधिकारी आणि महसूल विभागाचे क्षेत्रीय अधिकारी यांचे २४ व २५ ऑक्टोबरदरम्यान हे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजे उमाजी नाईक आणि वसंतराव नाईक यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. मंत्री श्री. सावे म्हणाले की, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. प्रशासकीय नियम व कार्यपद्धतींचे पालन करताना क्षेत्रीय स्तरावरील कामकाज अधिक सक्षम आणि परिणामकारक करण्यावर भर दिला पाहिजे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून विभागाच्या योजनांची अंमलबजावणी अधिक सुसूत्रपणे करण्यास मदत होईल.

नैना क्षेत्रात १५ लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट : मुख्यमंत्री

■ रायगड-अलिबाग (दै. संध्या)



नैना (नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र) परिसराच्या नियोजनबद्ध विकासातून सुमारे १५ लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट असून, त्यापैकी पाच लाख रोजगार उच्च वेतनाचे असतील. या विकासातून निर्माण होणाऱ्या संधींमध्ये भूमिपुत्रांना प्राधान्य देण्यात येईल. शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करून त्यांना विकासाचे भागीदार बनविण्यासह आधुनिक पायाभूत सुविधा आणि सक्षम कनेक्टिव्हिटीच्या माध्यमातून 'तिसरी मुंबई' महाराष्ट्राच्या विकासाचे नवे ग्रोथ इंजिन ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पनवेल तालुक्यातील शिरढोण येथे नैना (नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र) परिसरातील विकासकामांचे भूमिपूजन, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पूर्वेकडील जोडणीसाठी विकसित करण्यात आलेल्या एसबीआर-९, बीआर-४, बीआर-५ आणि उरण बायपास पूल या महत्त्वपूर्ण कनेक्टिव्हिटी प्रकल्पांचे लोकार्पण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भूधारकांना मालमत्ता पत्रकांचे वाटपही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पालकमंत्री भरत गोगावले, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, सर्वश्री खासदार श्रीरंग बारणे, सुनील तटकरे, अतुल पाटील, माजी खासदार रामशेठ ठाकूर, सर्वश्री आमदार निरंजन डावखरे, अनिकेत तटकरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, आमदार विक्रांत पाटील, प्रशांत ठाकूर, रवींद्र पाटील, महेश बालदी, महेंद्र दळवी, पनवेल महानगरपालिका महापौर नितीन पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अश्विन मुदगल, सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल, राजा दयानिधी, गणेश देशमुख, मुख्य प्रशासकीय अधिकारी सुरेश मेंगडे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे केवळ विमानतळ नसून संपूर्ण परिसराच्या आर्थिक विकासाला चालना देणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. विमानतळाच्या प्रभाव क्षेत्राचा नियोजनबद्ध आणि कालबद्ध विकास करण्यासाठी एकात्मिक विकास आराखडा तयार करून नगररचना योजनांच्या माध्यमातून या परिसराचा नियोजनबद्ध विकास करण्यात येत आहे. या नियोजनबद्ध विकासातून रोजगार निर्मितीला अधिक प्रमाणात चालना देण्यात येत आहे. भूधारकांच्या हातात जमिनीशी संबंधित कागदपत्रे दिल्यानंतरच विकासकामांचे भूमिपूजन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार गावनिहाय मोजणी, भूखंडांची ओळख, मालकी नोंदी आणि आवश्यक कागदपत्रांची प्रक्रिया पुढे नेण्यात येत आहे. भूधारकांचे प्रश्न सुटेपर्यंत राज्य सरकार त्यांच्या पाठीशी राहील, अशी ग्वाहीही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिली. महाराष्ट्रात मुंबई महानगर प्रदेशासह पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर अशी विविध विकासकेंद्रे विकसित होत आहेत. याच धर्तीवर ठाणे, नवी मुंबई, रायगड आणि पालघर हा परिसर आगामी काळात राज्याच्या आर्थिक विकासाचे महत्त्वाचे इंजिन ठरेल. हा विकास भूमिपुत्रांना सोबत घेऊन आणि त्यांच्या हिताचे संरक्षण करूनच केला जाईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

विविध संकल्पनांतून नैना क्षेत्राच्या विकासाला नवी दिशा

नैना परिसराचा विकास म्हणजे केवळ रस्ते, इमारती आणि नागरी वसाहती उभारणे नव्हे, तर रोजगार, पाणीपुरवठा आणि अन्य मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणेही महत्त्वाचे आहे. एज्युसिटी, मेडिसिटी, स्पोर्ट्स सिटी, एरोसिटी आणि नॉलेज सिटी यांसारख्या संकल्पनांमधून या क्षेत्रात विविध प्रकारच्या आर्थिक आणि सामाजिक संधी निर्माण होतील. मुंबई, नवी मुंबई, रायगड, ठाणे आणि पालघर या परिसरातील विकासाला नैना क्षेत्रामुळे नवी दिशा मिळेल, असा विश्वासही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

शबरी नॅचरल्सच्या पॅकेजिंगमधून आदिवासी संस्कृतीचे दर्शन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून गौरव; 'मन की बात'मध्ये शबरी नॅचरल्सचा उल्लेख

■ मुंबई (दै. संध्या)



शबरी नॅचरल्सचे पॅकेजिंग हे केवळ उत्पादनांचे वेष्टन नसून त्यातून आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडते. या पॅकेजिंगला आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'गुड डिझाईन अवॉर्ड' जाहीर झाल्याने आदिवासी संस्कृतीला जागतिक व्यासपीठ मिळाले आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या कार्यक्रमातून शबरी नॅचरल्सच्या उपक्रमाचे कौतुक केले. पंतप्रधानांनी 'मन की बात'च्या १३९ व्या भागात शबरी नॅचरल्सचा विशेष उल्लेख केला. महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत विकसित करण्यात आलेल्या 'शबरी नॅचरल्स' या ब्रँडने नैसर्गिक उत्पादनांच्या माध्यमातून आदिवासी बांधवांच्या पारंपरिक कला, कौशल्य आणि उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमातून 'व्होकल फॉर लोकल' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांना चालना मिळत असून, आदिवासी उद्योजकतेला नवी दिशा मिळत आहे. शबरी नॅचरल्सच्या उत्पादनांचे पॅकेजिंग हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्रातील वारली, गोंड आणि चित्रकथी यांसारख्या कला परंपरा तसेच आदिवासी लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब या पॅकेजिंगमधून उमटते. त्यामुळे उत्पादनांच्या माध्यमातून आदिवासी संस्कृतीची ओळख ग्राहकांपर्यंत पोहोचत आहे. या वैशिष्ट्यपूर्ण पॅकेजिंगला 'इंडिया डिझाईन मार्क' तसेच जपानचा प्रतिष्ठित 'गुड डिझाईन अवॉर्ड' प्राप्त झाला आहे. या सन्मानांमुळे शबरी नॅचरल्सच्या उत्पादनांना आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली आहे.

आदिवासी बांधवांनी तयार केलेली नैसर्गिक उत्पादने अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचावीत, यासाठी शबरी नॅचरल्सने डिजिटल माध्यमांचा अवलंब केला आहे. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि स्वतंत्र मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून ग्राहकांना ही उत्पादने सहज उपलब्ध होत आहेत. यामुळे दुर्गम भागांतील आदिवासी उत्पादकांना स्थानिक बाजारपेठेच्या पलीकडे जाऊन व्यापक ग्राहकवर्गापर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली आहे.

यासोबतच कॉर्पोरेट गिफ्टिंगच्या माध्यमातूनही शबरी नॅचरल्सच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध होत आहे. बांबू हस्तकला, नैसर्गिक व कृषी उत्पादने तसेच मोहापासून तयार केलेल्या वस्तूंच्या आकर्षक भेटसंचांना विविध संस्था आणि कॉर्पोरेट क्षेत्रातून मागणी मिळत आहे. या माध्यमातून आदिवासी कारागीर, शेतकरी आणि महिला बचत गटांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होत आहे. पारंपरिक कौशल्यांना आधुनिक बाजारपेठेशी जोडून आदिवासी समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देण्याचा या उपक्रमाचा प्रयत्न आहे.

तरुणांनी अमली पदार्थमुक्त भारताचे राजदूत बनावे : राज्यपाल जिष्णु देव वर्मा



■ मुंबई (दै. संध्या)

अमली पदार्थांचे व्यसन ही समाजापुढील, विशेषतः तरुण पिढीसमोरील गंभीर समस्या आहे. अमली पदार्थांचा पुरवठा रोखण्याबरोबरच त्यांची मागणी कमी करण्यासाठी जनजागृती, प्रतिबंध, पुनर्वसन आणि व्यसनाधीन व्यक्तींना आधार देणे आवश्यक आहे. तरुण पिढीने अमली पदार्थमुक्त भारताचे राजदूत बनून जनजागृती, प्रतिबंध आणि पुनर्वसनावर भर द्यावा, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त साजरा होणाऱ्या राष्ट्रीय एकता दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित 'नशामुक्त भारत – फाईट अगेन्स्ट ड्रग्ज' या राष्ट्रीय मोटारसायकल रॅलीच्या शुभारंभप्रसंगी राज्यपाल बोलत होते. नरीमन पॉईंट येथे झालेल्या या कार्यक्रमाला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, महापौर रितू तावडे, पोलीस महासंचालक सदानंद दाते, पोलीस आयुक्त देवेन भारती, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे आणि राज्य राखीव पोलीस बलाचे अपर पोलीस महासंचालक राजकुमार व्हटकर यांच्यासह विविध राज्यांतील पोलीस अधिकारी,कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून मोटारसायकल रॅलीला गुजरातकडे प्रस्थान देण्यात आले. विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील पोलीस दलांचे प्रतिनिधी तसेच केंद्रीय राखीव पोलीस दलाचे अधिकारी व जवान या रॅलीत सहभागी झाले आहेत. राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्याबरोबरच तरुणांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करणे हा या रॅलीचा उद्देश आहे. ही रॅली गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे पोहोचणार आहे.

संपादकीय

इथेनॉलचा फटका साखर कारखान्याना बसणार?

कोणत्याही सरकारचे कुठलेही धोरण हे दूरदृष्टीवर आधारित असावे, क्षणिक निर्णयावर नसावे, असा सर्वसामान्य कल असतो, मात्र इथेनॉल च्या बाबतीत केंद्र सरकारची भूमिका पाहिली तर धोरणात्मक सातत्यापेक्षा सोयीनुसार बदलण्याच्या निर्णयाचे दर्शन घडत आहे, कालपर्यंत उसापासून इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन देणारे सरकार आज त्याच इथेनॉलच्या निर्मितीवर निर्बंध आणत असेल तर या घुमजावाचा जाब विचारलाच पाहिजे, सरकारच्या प्रोत्साहनावर विश्वास ठेवून करोडो, अब्जावधी, रुपयाची गुंतवणूक करणाऱ्या साखर कारखान्यांनी कोणाच्या भरवशावर हे पाऊल उचलले?..... दुष्काळामुळे पाण्याचे महत्व अधोरेखित होत असले तरी आधी प्रोत्साहन द्यायचे? आणि नंतर धोरण बदलून गुंतवणूकदारांना अडचणीत टाकायचे? हा कारभार निश्चितच समर्थनीय नाही, इथेनॉल निर्मितीमागे साखरेची अतिरिक्त उत्पादन कमी करणे, इंधन आयात घटवणे, आणि शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळवून देणे, अशी उद्दिष्टे मांडण्यात आलेली होती, त्यानुसार साखर कारखान्यांनी प्रकल्प उभारले, मात्र आता ऊसाऐवजी मक्यापासून इथेनॉल निर्मितीला प्राधान्य देण्याची भूमिका पुढे येत असल्याचे समजते, पाण्याचा मर्यादाचा विचार उशिरा का होईना सरकारला झाला असेल तरच ते चांगलंच आहे, पण आधीच्या निर्णयाची जबाबदारी कोण घेणार?साखर उद्योग हा केवळ कारखानदारांचा व्यवसाय नसून त्यावर लाखो शेतकरी, कामगार, आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मोठे चक्र अवलंबून आहे,त्यामुळे धोरणातील बदलाचे परिणाम दुर्लक्षित करता येणार नाही, महाराष्ट्रात अनेक भागात पाणीटंचाईचे संकट गंभीर होत असताना ऊस पिकासाठी होणारा मोठा पाणी वापर खरोखर चिंतेचा विषय आहे, पावसावर अवलंबून असलेल्या प्रदेशात पाण्याची उपलब्धता,पडताळून न पाहाता ऊस उत्पादनाला प्रोत्साहन देणे, दीर्घकालीन दृष्टीने धोकादायक ठरू शकते, मात्र या वास्तवाचे भान धोरण आखतानाच असायला हवे होते, दुष्काळ पडल्यानंतर जाग येणे?हे नियोजनाचे सपशेल अपयश आहे, त्याच वेळी ऊसापासून इथेनॉल निर्मितीवर निर्बंध आणून मक्याला प्राधान्य दिल्यास अन्नसुरक्षा, आणि पशुखाद्याच्या उपलब्धतेवर परिणाम होऊ शकतो. याचाही विचार करणे आवश्यक आहे, आपल्या देशाला खाद्यतेल, आणि डाळीच्या आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागत असताना मक्याच्या औद्योगिक वापराला प्रोत्साहन देण्याचे गणित तपासावे लागेल, मका लागवडीला वाढती मागणी मिळाल्याने शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते, परंतु त्यामुळे इतर जीवनावश्यक पिकाचे क्षेत्र घटल्यास आयातीवरील अवलंबित वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही, एका बाजूला इंधनासाठी देशांतर्गत पिकाचा वापर वाढवायचा, आणि दुसऱ्या बाजूला खाद्यतेल, डाळी, यासाठी परदेशावर अवलंबून राहायचे, हा मोठा विरोधाभास आहे. स्वावलंबन महत्त्वाचे असले तरी अन्नसुरक्षेची किंमत मोजून ते सांगता कामा नये. भारत अमेरिका व्यापार या चर्चेच्या पार्श्वभूमीवर मक्याचा वापराचा मुद्दाही महत्त्वाचा ठरतो, अमेरिकेतील जनुकीय सुधारित मक्याच्या थेट आयातीवर भारतात मर्यादा असताना त्यापासून तयार होणाऱ्या पशुखाद्याच्या आयातीचा प्रश्न वेगळा आहे, भारतीय मक्याचा इथेनॉलसाठी वापर वाढवताना परदेशी पशुखाद्याची आयात वाढणार असेल तर त्याचे परिणाम तपासले पाहिजेत, यामागे विशिष्ट व्यापारविषयक हेतू असल्याचे पुराव्याशिवाय म्हणता येणार नाही, मात्र कृषी धोरण, आणि आंतरराष्ट्रीय व्यापार, याचा परस्पर संबंध पारदर्शक असणे आवश्यक आहे, या प्रकरणात साखर कारखानदारांनी ही आत्मपरीक्षण करायला हवे, राजकीय सत्तेची जवळीक ठेवल्याने आपले व्यावसायिक फायदा व हित सुरक्षित राहील, असा विश्वास ठेवणे धोकादायक आहे, सरकारच्या प्रोत्साहनावर गुंतवणूक करताना बाजारपेठ, कच्चा मालाची उपलब्धता, पाणी वापर, आणि धोरणातील संभाव्य बदल याचा स्वतंत्र विचार करणे, ही साखर उद्योगाची ही जबाबदारी आहे, मात्र सरकारने प्रोत्साहन देऊन गुंतवणूक करूवून घेतल्यावर अचानक निर्बंध लादणे हे पण योग्य नाही, धोरण बदल अपरिहार्य असू शकतात, पण त्यासाठी संक्रमणकालीन व्यवस्था, स्पष्ट कालमर्यादा, आणि गुंतवणुकीचे नुकसान टाळणारे उपाय, आवश्यक आहे. इथेनॉलचा प्रश्न केवळ साखर उद्योगापुरता मर्यादित नाही, तो पाणी व्यवस्थापन, शेती, अन्नसुरक्षा, आणि ऊर्जा स्वावलंबनाशी जोडलेला आहे, त्यामुळे सरकारने भावनेपेक्षा वस्तुनिष्ठ अभ्यासाच्या आधारे निर्णय घ्यावेत, ऊसापासून इथेनॉल निर्मितीवर मर्यादा आणताना आधीच्या गुंतवणुकीचे काय होणार?....मक्याला प्राधान्य दिल्यास इतर पिकावर काय परिणाम होणार?.... आणि शेतकऱ्याचे हित कसे जपले जाणार?.... याची उत्तरे सरकारला द्यावी लागतील, आज ऊस.उद्या मका. आणि परवा दुसरेच पीक?...असा धोरणाचा चेंडू सतत हलत राहिला, तर या बदलाचा फटका शेतकरी,आणि उद्योगांना बसेल, सरकारने घोषणेचा गाजावाजा करण्यापेक्षा पाणी, शेती, उद्योग, आणि ऊर्जा याचा समतोल साधणारे स्थिर,पारदर्शक, आणि दूरदृष्टीचे धोरण आखावे लागेल,अन्यथा इथेनॉल च्या नावाने सुरू झालेला प्रवास सहकारी व खाजगी साखर कारखान्याचे अस्तित्व संपुष्टात आणल्याशिवाय राहणार नाही. , सध्या देशातील साखर उद्योग ऊसाअभावी १८० दिवसावरून ९० दिवसावर येऊन ठेपलेला आहे, उसाची कमतरता,वाढता खर्च, वाहतूक यामुळे साखर कारखानदार मेटाकूटीला आलेले आहेत, सद्या महाराष्ट्रासह देशातील अनेक साखर कारखाने बंद अवस्थेत आहेत, ते कधी सुरू होतील?...हे कोणालाच सांगता येणार नाही, अशा परिस्थितीमध्ये जे बऱ्यापैकी साखर कारखाने चालतात त्यांना इथेनॉल निर्मितीचा मोठा आधार होता, त्यामुळे ते कारखाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही चांगला भाव देऊ शकत होते, या सरकारने इथेनॉलवर जर कायमस्वरूपी बंदी घातली तर महाराष्ट्रातील अनेक साखर कारखाने बंद पडलेले दिसतील अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे, त्यामुळे सहकारी साखर कारखाने वाचवण्यासाठी केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीचे धोरणात बदल करू नये असे वाटते.

६५ वाहनचालकांवर कारवाई

■ शिरूर (दै. संध्या)

■ शिरूरमध्ये वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर पोलिसांचा दणका

■ बी.जे. कॉर्नर येथे नाकाबंदी; ८१ हजार रुपयांचा दंड वसूल



शिरूर शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी शिरूर पोलिसांनी बी.जे. कॉर्नर येथे नाकाबंदी करून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध विशेष मोहीम राबवली. गुरुवारी (दि. २२ ऑक्टोबर) करण्यात आलेल्या या कारवाईत तब्बल ६५ वाहनचालकांवर वाहतूक नियमभंगाचे गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून एकूण ८१ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. शहरातील वाहतूक व्यवस्था सुरक्षित आणि शिस्तबद्ध राहावी, यासाठी पोलिसांनी ही कारवाई केली. यावेळी वाहनांच्या काचांना काळ्या फिल्म लावणे, नियमबाह्य आकर्षक क्रमांकपट्ट्यांचा वापर करणे, दुचाकीवर तीन जण बसवून प्रवास करणे, वाहनांना प्रखर दिवे लावणे तसेच वैध वाहनचालक परवाना नसताना वाहन चालवणे, अशा विविध प्रकारच्या नियमभंगांवर पोलिसांनी कारवाई केली.

वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष केल्याने अपघातांचा धोका वाढतो. वाहनांच्या काचांना काळ्या फिल्म लावणे, नियमबाह्य क्रमांकपट्ट्या वापरणे आणि इतर वाहनचालकांना त्रासदायक ठरणारे प्रखर दिवे लावणे यामुळे रस्त्यावरील सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळावेत, असे आवाहन शिरूर पोलिसांनी केले आहे. वाहन चालवताना वैध परवाना जवळ ठेवणे, वाहनावर नियमानुसार क्रमांकपट्टी लावणे आणि वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध यापुढेही अशाच प्रकारच्या कारवाया सुरू राहणार असल्याचा इशारा शिरूर पोलीस स्टेशनच्या वतीने देण्यात आला आहे.

दैनिक संध्याच्या बातमीची दखल

अंगणवाडी परिसराची स्वच्छता

■ वालचंदनगर (दै. संध्या)



लासुर्णे (ता. इंदापूर) : दैनिक संध्याने अंगणवाडी क्र. २ जवळील अस्वच्छतेचा प्रश्न मांडल्यानंतर कचरा टाकणाऱ्या संबंधित स्थानिक दुकानदाराने तातडीने परिसराची स्वच्छता केली.

दि. २५ ऑक्टोबर रोजी दैनिक संध्यामध्ये 'लासुर्णेतील अंगणवाडी क्र. २ जवळ अस्वच्छतेचे साम्राज्य' या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध झाली होती. या बातमीची दखल घेत संबंधित दुकानदाराने परिसरातील कचरा, पालापाचोळा व साचलेली माती हटवून स्वच्छता केली. दैनिक संध्याच्या बातमीमुळे अस्वच्छतेचा प्रश्न मार्गी लागल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. तसेच, बातमीची दखल घेऊन परिसर स्वच्छ केल्याबद्दल संबंधित दुकानदाराचे आभार व्यक्त करण्यात आले. अंगणवाडी परिसर स्वच्छ झाल्याने लहान मुलांना येण्या-जाण्यासाठी व खेळण्यासाठी स्वच्छ वातावरण उपलब्ध झाले आहे.

धामणीच्या खंडोबा मंदिरात दीपमाळेच्या कामाचा शुभारंभ



■ मंचर (दै. संध्या)

श्री. म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान मंदिर धामणी (तालुका आंबेगाव) येथील "मार्तंड" महाद्वाराच्या समोर नवीन दुस-या दगडी दीपमाळेच्या बांधकामाचा शुभारंभ रविवारी (२५ ऑक्टोबर २६) सकाळी रहाटणी (पिंपरी चिंचवड) येथील जेष्ठ उद्योजक श्री किरण खुळे यांच्या हस्ते संपन्न झाला. नव्याने बांधण्यात येणाऱ्या दगडी दीपमाळेच्या बांधकामाचा संपूर्ण खर्च खुळे कुटुंबीय करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी खुळे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. ही दीपमाळ येणा-या चंपाषष्ठी पर्यंत पूर्ण करणार असल्याचे सांगण्यात आले. यावेळी सेवेकरी दादाभाऊ भगत, सुभाष तांबे, सखाराम तांबे, भिकाजी पाटील, उपस्थित होते.

श्री भैरवनाथ जनसेवा विद्यालय क्रीडा प्रकारात जिल्ह्यात अव्वल

■ उंडवडी क.प (दै. संध्या)



जिल्हा परिषद पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय जिल्हास्तरीय आट्यापाट्या क्रीडा स्पर्धेमध्ये श्री भैरवनाथ जनसेवा विद्यालय उंडवडी क.प १७ वर्षे वयोगट मुले व १७ वर्षे वयोगट मुली यांनी जिल्हास्तरीय आट्यापाट्या सांघिक विजेतेपद पटकावले.१४ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघामध्ये जराड रोहित अजित,बनकर ओम सुनील,काळे कुणाल किरण,जराड संस्कार दत्तात्रय,साळुंके आर्यन अनिल,भोईटे स्वराज प्रमोद,घुले जयराम आप्पा,आटोळे अथर्व कैलास,सय्यद असद जावेद, चव्हाण सुरज बापूराव,झगडे सत्यजित सोमनाथ आणि कोकरे आर्यन राहुल यांनी तर १७ वर्षीय मुलींच्या संघामध्ये कु.सिद्धी राजेंद्र साळुंके,सायली चंद्रकांत जराड,सृष्टी बाळासाहेब जाधव, जान्हवी नवनाथ जराड,कादंबरी किरण जराड,अंजली अनिल साळुंके,काजल नवनाथ जराड, साक्षी लक्ष्मण साळुंके,सोनाक्षी बाळासो बनकर,किरण गणेश गोलांडे, प्रणिता बापू चव्हाण,रिया राजकुमार जराड,दीक्षा पप्पू जगताप या खेळाडूंनी नेत्रदीपक कामगिरी करून पुणे जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांकाने स्पर्धा विजेते होण्याचा मान दोन्ही संघांनी मिळवला.

यामुळे विद्यालयाचे दोन्ही संघ विभागीय पातळीवर खेळण्यासाठी निवडले गेले आहेत. विद्यालयातील क्रीडा शिक्षक श्री.घुले संजय जगन्नाथ व श्री.वाडते रवींद्र सुदाम यांनी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

श्री भैरवनाथ शिक्षण मंडळाचे चेअरमन मा.श्री.अशोक आप्पा साळुंके,सचिव मा.श्री.सतीशराव जराड,सर्व संचालक मंडळ, विद्यालयाचे मुख्याध्यापक वल्लभ चौधरी सर यांनी सर्व खेळाडूंचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले.वरील सर्व खेळाडूंचे शाळा व शाळेच्या परिसरात कौतुक होत आहे.

सुरेश केसरकर यांची सल्लागार म्हणून नियुक्ती

■ राज्य गुणवंत कामगार असोसिएशनला दुसऱ्यांदा प्रतिनिधित्वाची संधी

■ कामगारांच्या प्रश्नांना राष्ट्रीय स्तरावर वाचा फोडण्याची संधी



■ कोरेगावमूळ (दै. संध्या)

कामगार, कष्टकरी, वंचित आणि गरजू घटकांच्या विकासासाठी सातत्याने कार्य करणारे राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष तथा लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे पश्चिम महाराष्ट्र विभागीय संघटन प्रमुख पत्रकार सुरेश केसरकर यांची भारत सरकारच्या दत्तोपंत ठेंगडी केंद्रीय श्रमिक शिक्षण मंडळाच्या पुणे विभागीय कार्यकारिणीवर सल्लागार म्हणून दुसऱ्यांदा नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक आणि कामगाराभिमुख कार्याची दखल घेऊन ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. पुणे येथील केंद्रीय श्रमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय कार्यालयात नूतन अध्यक्ष नितीन केंजळे आणि पुणे व गोवा विभागाच्या प्रमुख अरुणा वाघ यांच्या उपस्थितीत नूतन कार्यकारिणीची पहिली बैठक पार पडली. या बैठकीत पुणे विभागातील पात्र कामगारांना केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

केंद्रीय श्रमिक शिक्षण मंडळाच्या माध्यमातून संघटित आणि असंघटित क्षेत्रातील कामगार, शेतमजूर, अल्पभूधारक, साखर कारखान्यांतील कामगार तसेच महिला कामगारांसाठी विविध उपक्रम आणि प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जातात. कामगारांमध्ये त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांना शासकीय योजनांची माहिती देणे आणि त्यांची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगती साधण्यासाठी प्रयत्न करणे, हा या उपक्रमांचा प्रमुख उद्देश आहे.


सुरेश केसरकर हे राज्य गुणवंत कामगार असोसिएशनच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून कामगारांच्या प्रश्नांवर कार्यरत आहेत. कामगारांच्या हक्कांचे संरक्षण, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी, गुणवंत कामगारांना योग्य प्रतिनिधित्व मिळवून देणे, सामाजिक न्याय आणि जनजागृती यांसारख्या विषयांवर त्यांनी सातत्याने काम केले आहे. जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर विविध सामाजिक उपक्रम राबवून त्यांनी समाजातील वंचित आणि गरजू घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी योगदान दिले आहे.

पाईपलाईनच्या गळतीवरून वाद; ६० वर्षीय महिलेला मारहाण

■ सहा जणांविरुद्ध गुन्हा

■ टाकळी हाजीतील साबळेवाडी येथील घटना

■ शिरूर पोलिसांत गुन्हा दाखल



■ कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूरच्या बेट भागातील टाकळी हाजी येथील साबळेवाडी येथे पाईपलाईनच्या गळतीवरून झालेल्या वादातून ६० वर्षीय महिलेला शिवीगाळ व दमदाटी करून हाताने, लाथाबुक्क्यांनी तसेच लाकडी फळीने मारहाण केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फुलाबाई राघु चव्हाण (वय ६०, रा. साबळेवाडी, टाकळी हाजी) यांच्या फिर्यादीनुसार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी पाईपलाईनमधून शेतात गळती होत असल्याच्या कारणावरून आरोपींनी वाद घालून मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी विलास गिरीधर चव्हाण, कांताबाई अंकुश शिंदे, कल्पना रमेश शिंदे, गिरीधर अप्पा चव्हाण, कैलास गिरीधर चव्हाण आणि लिलाबाई गिरीधर चव्हाण (सर्व रा. साबळेवाडी, टाकळी हाजी) यांच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक ९६९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ए.एस.आय. चव्हाण करीत आहेत.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या १०० व्या साहित्य संमेलनानिमित्त बारामतीत साहित्यिक अभिवादन

२८ ऑक्टोबर रोजी एकांकिका सादरीकरण, साहित्यिक परिसंवाद, प्रवीण तरडे यांच्याशी संवाद आणि 'आठवणीतील अजितदादा' या श्रद्धांजलीपर गीतांचे सादरीकरण



■ बारामती (दै. संध्या)

महाराष्ट्र साहित्य परिषद,बारामती शाखेच्या वतीने महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या १०० व्या साहित्य संमेलनानिमित्त बुधवार,दिनांक २८ ऑक्टोबर २०२६ रोजी बारामती येथे विविध साहित्यिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.लोकनेते स्व.अजितदादा पवार यांच्या दुःखद निधनामुळे निर्माण झालेल्या शोकमय वातावरणाची जाणीव ठेवून,त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्याच्या भावनेतून या उपक्रमांची आखणी करण्यात आली आहे. बारामतीच्या शैक्षणिक, साहित्यिक,नाट्य आणि सांस्कृतिक जडणघडणीमध्ये लोकनेते अजितदादांचे योगदान अत्यंत मोलाचे राहिले आहे. बारामतीतील विविध शैक्षणिक संस्था,सांस्कृतिक चळवळी आणि कलाक्षेत्राला त्यांनी सातत्याने पाठबळ दिले.नव्या पिढीला शिक्षणाबरोबरच साहित्य,कला आणि संस्कृतीची समृद्ध परंपरा लाभावी, यासाठी त्यांनी सदैव प्रोत्साहन दिले.त्यांच्या जाण्याने बारामतीच्या सार्वजनिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत साहित्य,रंगभूमी आणि संगीताच्या माध्यमातून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करणे, त्यांनी जपलेल्या सांस्कृतिक मूल्यांचा वारसा पुढे नेणे आणि नवोदित कलाकारांना वैचारिक व कलात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देणे,या भावनेतून सदर उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत.संपूर्ण आयोजन संयत आणि स्मृतिप्रधान वातावरणात करण्यात येणार आहे. बुधवार,दिनांक २८ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, विद्या प्रतिष्ठानचे अभियांत्रिकी महाविद्यालय आणि शारदानगर येथील पी.जी.आर.सी. सेंटर या तीन ठिकाणी एकांकिका सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले आहे. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील उपक्रमात नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष,लेखक,दिग्दर्शक व नाट्यसमीक्षक राज काझी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.विद्या प्रतिष्ठानच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष,लेखक,दिग्दर्शक व अभिनेते योगेश सोमण सहभागी होणार आहेत. शारदानगर येथील उपक्रमात प्राचार्य राजकुमार देशमुख यांच्या उपस्थितीत 'रंग जगण्याचा' या एकांकिकेचे सादरीकरण होणार आहे. या तिन्ही ठिकाणी एकांकिका या साहित्यप्रकाराचे महत्त्व,त्यातील आशय,लेखन आणि रंगभूमीशी असलेले नाते याविषयी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी ४ वाजता एकांकिका लेखन,दिग्दर्शन आणि अभिनयावर विचारमंथन दुपारी ४ वाजता बारामती येथील डॉ. अप्पासाहेब पवार सभागृहात 'एकांकिका लेखन,दिग्दर्शन आणि अभिनय' या विषयावर साहित्यिक परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. या परिसंवादात महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण, नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष राज काझी,ज्येष्ठ दिग्दर्शक व अभिनेते श्रीष देशपांडे आणि नाट्यदिग्दर्शक व अभिनेते विवेक पांडकर सहभागी होणार आहेत. एकांकिका लेखनातील आशयघनता,दिग्दर्शनातील सर्जनशीलता,अभिनयाची अभिव्यक्ती आणि मराठी रंगभूमीसमोरील बदलती आव्हाने यांवर या परिसंवादातून विचारमंथन होणार आहे. सायंकाळी ५.३० वाजता डॉ.अप्पासाहेब पवार सभागृहात प्रसिद्ध अभिनेते,लेखक व दिग्दर्शक प्रवीण तरडे यांच्याशी विशेष संवाद आयोजित करण्यात आला आहे. मराठी चित्रपटसृष्टी आणि रंगभूमीवरील त्यांचा प्रवास, लेखन,अभिनय,दिग्दर्शन तसेच साहित्य आणि समाजजीवन यांच्यातील परस्परसंबंध यांचा या संवादातून वेध घेतला जाणार आहे. यावेळी राज काझी आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांचीही उपस्थिती राहणार आहे.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



निकमार विद्यापीठ, पुणे येथे तिसरा दीक्षान्त समारंभ उत्साहात संपन्न

पुणे : दैनिक संध्या

निकमार विद्यापीठ, पुणे येथे शुक्रवार, २३ ऑक्टोबर रोजी विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात तिसरा दीक्षान्त समारंभ पार पडला. या समारंभात १२ शैक्षणिक अभ्यासक्रमांतील एकूण १,३६९ विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील हा महत्त्वाचा टप्पा ठरला. उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीबद्दल १२ विद्यार्थ्यांना सुवर्णपदकांनी गौरविण्यात आले. तसेच, २०२३ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाच्या पहिल्या पीएच.डी. संशोधकाला यावर्षी पदवी प्रदान करण्यात आल्याने हा समारंभ विद्यापीठासाठी ऐतिहासिक ठरला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती वंदनेने झाली. त्यानंतर निकमार विद्यापीठ, पुणेचे अध्यक्ष डॉ. विजय गुपचुप, एल अँड टीचे वरिष्ठ उपाध्यक्ष व मुख्य मानव संसाधन अधिकारी डॉ. सी. जयकुमार आणि डॉ. तपश कुमार गांगुली, महानिदेशक, निकमार यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. विजय गुपचुप यांनी समारंभाचे औपचारिक उद्घाटन केले. निकमार विद्यापीठ, पुणेचे कुलगुरू डॉ. अनिल अग्रवाल यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि पदवीधर विद्यार्थ्यांना शपथ दिली. आपल्या भाषणात त्यांनी यावर्षी विद्यापीठ १२ अभ्यासक्रमांतील १,३६९ विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करत असल्याचे नमूद केले. २०२३ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाच्या पहिल्या पीएच.डी. संशोधकाला पदवी मिळत असल्याबद्दल त्यांनी अभिमान व्यक्त केला आणि हा विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्य, आनंदी, आणि समाधानकारक आयुष्यासाठी शुभेच्छा देत, विद्यापीठात मिळवलेले ज्ञान आणि मूल्ये आपल्या व्यावसायिक जीवनात जपण्याचे आवाहन त्यांनी केले.



अष्टसिद्धी हनुमान मंदिरामध्ये नवमीनिमित्त कन्या पूजन व कन्या भोज

पुणे : दैनिक संध्या

साचापिर स्ट्रीट कॅम्प पुणे येथील श्री वैष्णव बनिया संस्थानच्या श्री अष्टसिद्धी हनुमान मंदिरामध्ये शारदीय नवरात्रीमध्ये महानवमीच्या दिवशी कन्या पूजन आणि कन्या भोज करण्यात आले होते. या दिवशी लहान मुलींना साक्षात आदिमाया दुर्गा देवीचे रूप मानून त्यांची पूजा केली जाते. यावेळी कन्या पूजन मुलींना दक्षिणा म्हणून पैसे आणि भेटवस्तू देण्यात आले. यावेळी श्री वैष्णव बनिया संस्थानचे सेक्रेटरी आशिष राजोरे, व्यवस्थापक सुशील खंडेलवाल, मॅनेजिंग ट्रस्टी श्याम राजोरे, रंजीत शुक्ला, आदी उपस्थित होते.

सम्राट अशोक विजयादशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त पुणे दुमदुमले

पुणे : दैनिक संध्या

सम्राट अशोक विजयादशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त बौद्ध धम्मीय सेवा संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली पहिली 'धम्म पहाट' बुद्ध-भीम गीतांच्या संगीतमय मैफिलीने उत्साहात आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाली. मंगळवारी, २० ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला पुणे शहर व परिसरातील धम्मबांधव, भगिनी, तरुण-तरुणी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. प्रसिद्ध गायक राहुल शिंदे यांनी सादर केलेल्या बुद्धगीतांनी आणि भीमगीतांनी उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या सुरेल आवाजातील गीतांमुळे संपूर्ण परिसर बुद्धमय आणि भीममय झाला. गीतांच्या माध्यमातून भगवान गौतम बुद्धांचा करुणा, मैत्री व समतेचा संदेश आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. ही संगीतमय धम्मपहाट उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला. बौद्ध धम्मीय सेवा संघाच्या वतीने प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या 'धम्म पहाट' कार्यक्रमाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल आयोजकांनी उपस्थितांचे आभार मानले. अशा उपक्रमांमुळे बुद्ध-भीम विचारांचा प्रसार होण्यास आणि नव्या पिढीमध्ये धम्मसंस्कार रुजण्यास मदत होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. यावेळी रिपाईचे नगरसेवक निलेशभाऊ आल्हाट, नगरसेवक हिमानीताई कांबळे,माजी उपमहापौर सुनीताताई परशुराम वाडेकर,शैलेश चव्हाण, संजय सोनवणे, महीपाल वाघमारे, अशोक शिरोळे दलित पँथर राष्ट्रीय अध्यक्ष बापूसाहेब भोसले, एस बी एन ग्रुप चे अध्यक्ष सोनूभाऊ निकाळजे, प्रशांत कसबे, वसंतदादा साळवे, विलास वंनशिव, किशोर रिकबे, भारतीय बौद्ध महासभा पुणे शहर अध्यक्ष राजरत्न थोरात, समता सैनिक दलाचे कमांडर अनिल कांबळे, अनिल सोनवणे, बसपाचे नेते किरण आल्हाट, संविधान ग्रुप सचिन गजरमल,,राकेश सोनवणे,युवारत्न सेवा समितीचे अध्यक्ष सचिन वाघमारे, किशोर कांबळे, बामसेफचे शंतनू भेंगळे, वेसाक फाऊंडेशनचे राहुल बनसोडे, प्रा.प्रकाश पवार प्रा.मिलिंद निकाळजे, प्रशांत सोनवणे, सतीश साबळे, सर्जेरावभाऊ वाघमारे, हणमंत आण्णा पपुल, आकाश कांबळे, हंसराज खुणे, कमलेश चाबुकस्वार, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन विवेक बनसोडे, सतीश गायकवाड, युवराज बनसोडे, आदींनी केले होते.

एमपीएससी चौकशी आयोगाची अद्याप एकही बैठक नाही

पुणे : दैनिक संध्या

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभारातील कथित गैरप्रकारांची चौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या आयोगाच्या कामकाजाला अद्याप सुरुवात झाली नसल्याचा आरोप स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांनी केला आहे. आयोगाला ६० दिवसांत अहवाल सादर करण्याची मुदत देण्यात आली असताना, त्यातील १५ दिवस उलटूनही एकही बैठक झालेली नाही. तसेच, चौकशीचे नेमके स्वरूप आणि कार्यपद्धती निश्चित करणारा आराखडाही तयार झालेला नाही.

खरी समृद्धी ज्ञानातूनच निर्माण होते : डॉ. श्रीपाल सबनीस

लक्ष्मी रोडची ओळख सरस्वतीच्या ज्ञानपरंपरेशीही जोडली जावी - डॉ.श्रीपाल सबनीस

लक्ष्मी रोडवर ज्ञानाचा जागर; 'वॉव' भव्य पुस्तक प्रदर्शनाचे डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)

पुण्यातील लक्ष्मी रोडची ओळख केवळ व्यापार आणि वैभवापुरती मर्यादित न राहता ती सरस्वतीच्या ज्ञानपरंपरेशीही जोडली जावी. सोन्यापेक्षा ज्ञानाची श्रीमंती मोठी असून, खरी समृद्धी ज्ञानातूनच निर्माण होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक आणि विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. लक्ष्मी रोडवरील जुन्या विजय टॉकीजजवळ असलेल्या 'वॉव पब्लिशिंग्ज प्रांगणा'त आयोजित 'वॉव' भव्य पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विश्वकर्मा पब्लिकेशन्सचे विशाल सोनी, इतिहास संशोधक संदीप तापकिर आणि तेजज्ञान फाउंडेशनच्या प्रेमा भटेवरा उपस्थित होते. लक्ष्मी रोडवर साड्या आणि सोन्याच्या खरेदी-विक्रीला मोठे महत्त्व आहे. याच परिसरात पुस्तक प्रदर्शनाच्या माध्यमातून ज्ञानाचा आणि वाचनसंस्कृतीचा जागर घडविणे ही ऐतिहासिक आणि स्वागतार्ह बाब आहे, असे डॉ. सबनीस यांनी नमूद केले.



करताना डॉ. सबनीस म्हणाले की, अध्यात्म, मानसिकता, जीवन व्यवस्थापन आणि आत्मविकास या क्षेत्रांत सरश्री यांचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

त्यांनी मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांमध्ये ३०० हून अधिक पुस्तके लिहिली आहेत. मानवाचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक, आर्थिक, सामाजिक आणि आध्यात्मिक विकास साधणे हा त्यांच्या साहित्याचा मुख्य उद्देश आहे. सरश्री यांच्या पुस्तकांमधून वाचकांना जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची, स्वतःला समजून घेण्याची आणि जीवन अधिक समृद्ध व अर्थपूर्ण बनविण्याची प्रेरणा मिळते. या प्रदर्शनात मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांतील २० हजारांहून अधिक पुस्तकांचा समृद्ध संग्रह उपलब्ध आहे. धार्मिक, आध्यात्मिक, शैक्षणिक, कादंबरी, बालसाहित्य अशा विविध विषयांवरील पुस्तकांचा त्यात समावेश आहे. विविध वयोगटांतील वाचक, विद्यार्थी, साहित्यप्रेमी आणि अभ्यासकांसाठी हे प्रदर्शन ज्ञान, मनोरंजन आणि वैचारिक समृद्धीची पर्वणी ठरणार आहे.

संपत्तीपेक्षा ज्ञानाचे महत्त्व अधिक असून, वाचनामुळे समाजात विवेक, विचारशीलता आणि वैचारिक समृद्धी वाढते, असेही त्यांनी सांगितले. आध्यात्मिक गुरू सरश्री यांच्या साहित्यिक योगदानाचा उल्लेख

'वॉव' भव्य पुस्तक प्रदर्शन २२ नोव्हेंबरपर्यंत दररोज सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे. पुस्तकप्रेमी, विद्यार्थी आणि साहित्यरसिकांनी या प्रदर्शनाला आवर्जून भेट देऊन वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता पौराणिक यांनी केले.

'यादे' ही उबदारपणा आणि आपलेपणाने भरलेली सुंदर जीवनकथा!"

■ पुणे (दै. संध्या)

नात्यांमधील प्रेम, भावनिक गुंतागुंत, विनोद आणि दैनंदिन जीवनातील हलकेफुलके प्रसंग यांचा सुंदर मिलाफ असलेली 'यादे' ही मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. सोनी सब वाहिनीवरील या मालिकेत अभिनेत्री सेहज राजपूत जियाची भूमिका साकारत आहे. मालिकेतील नव्या घडामोडी, जियाच्या आयुष्यातील बदल आणि तिच्या नात्यांचा प्रवास याविषयी सेहजने आपले अनुभव सांगितले. मालिकेच्या कथेत डॉ. देव (इक्बाल खान) आपल्या कुटुंबासह किल्लारी गावात राहायला येतात. त्यानंतर जियाच्या आयुष्यात अनेक नवे बदल घडू लागतात. नव्या वातावरणाशी जुळवून घेताना तिच्यासमोर नवी आव्हाने उभी राहतात. त्याचबरोबर नव्या ओळखी, नाती आणि अनुभवांमुळे तिच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे पैलूही समोर येतात. जियाच्या व्यक्तिरेखेविषयी बोलताना सेहज म्हणाली की, लहान वयात अनेक कठीण प्रसंगांचा सामना केल्यामुळे जिया समजूतदार आणि परिपक्व झाली आहे. मात्र, तिच्या



स्वभावातील गोडवा, प्रेमळपणा आणि कुटुंबाला एकत्र ठेवण्याची इच्छा कायम आहे. आपल्या आई-वडिलांना पुन्हा एकत्र आणणे हे तिचे मोठे ध्येय आहे. या प्रयत्नांत ती स्वतःचे बालपण मनमुरादपणे जगणे मात्र विसरून गेली आहे. मल्हारची भेट झाल्यानंतर जियाच्या आयुष्यात नवा आनंद निर्माण होतो. त्याच्या सहवासात ती स्वतःमधील खोडकर, निरागस आणि बेफिकीर बाजू पुन्हा अनुभवू लागते. मल्हारमुळे तिला जणू आपले हरवलेले बालपण पुन्हा सापडते. या दोघांमधील गोड नाते आणि जियाने आई-वडिलांना जवळ आणण्यासाठी केलेले छोटे छोटे प्रयत्न प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहेत.

मनपा शाळांमध्ये ओळख श्री ज्ञानेश्वरी उपक्रमाचा उत्साहात शुभारंभ

■ पुणे (दै. संध्या)

विद्यार्थ्यांमध्ये आध्यात्मिक, नैतिक आणि संस्कारक्षम मूल्यांची रुजवण व्हावी, या उद्देशाने वडगावशेरी येथील पुणे महानगरपालिकेच्या तीन शाळांमध्ये 'ओळख श्री ज्ञानेश्वरी आणि हरिपाठ' या उपक्रमाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. श्री संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र समितीचे अध्यक्ष तथा 'ओळख श्री ज्ञानेश्वरी' परिवाराचे समन्वयक प्रकाश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सुरू करण्यात आला. या उपक्रमांतर्गत इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना हरिपाठाचे, तर इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना 'ओळख श्री ज्ञानेश्वरी' या माध्यमातून मूल्यशिक्षणाचे धडे दिले जाणार आहेत. सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत तीनही शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने वर्गांचे आयोजन करण्यात आले. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांची ओळख करून देत विद्यार्थ्यांमध्ये चांगले संस्कार रुजविणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. यावेळी नगरसेवक योगेश मुळीक, नारायण गलांडे, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी विजय आवारी, माजी शिक्षणाधिकारी कृष्णकांत चौधरी आणि वडगावशेरी भजनी मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब पाडाळे उपस्थित होते. तसेच



ज्ञानेश्वरीतील विचार आचरणात आणा

"संत ज्ञानेश्वर माऊलींच्या इच्छेने आणि प्रेरणेने आळंदीहून येऊन हा संस्कारक्षम उपक्रम सुरू करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सातत्य ठेवून ज्ञानेश्वरी आणि हरिपाठातील संस्कार आत्मसात करावेत," असे आवाहन प्रकाश मामा काळे यांनी केले. तर माजी शिक्षणाधिकारी कृष्णकांत चौधरी यांनी संतांच्या वाणीचे आणि ज्ञानेश्वरीतील विचारांचे केवळ श्रवण न करता त्यांचे लक्षपूर्वक चिंतन, मनन करून प्रत्यक्ष जीवनात आचरण करण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. शालेय वयातच विद्यार्थ्यांमध्ये आध्यात्मिक आणि नैतिक मूल्यांची जडणघडण व्हावी, या दृष्टीने सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचे पालक आणि ग्रामस्थांनी स्वागत केले. संत साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संस्कारांचे बळ मिळणार असल्याने या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.

उपक्रमाचे शिक्षक ह.भ.प. मारुती महाराज गलांडे, निताताई गलांडे, सुरेखाताई भांबुरे, मुख्याध्यापक अशोक लंघे, पूजा सोमवंशी, बाळासाहेब नवले यांच्यासह शिक्षकवृंद, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले.

नवरात्रौ महोत्सवाची "कारवाँ सितारो का" कार्यक्रमाने सांगता

■ पुणे (दै. संध्या)

भारतीय चित्रपट सृष्टीतील दिलीप कुमार, राज कपूर, देव आनंद, शम्मी कपूर, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, रेखा आणि हेमा मालिनी या लोकप्रिय अभिनेत्यांवर चित्रित झालेल्या सुमधुर गीतांची "कारवाँ सितारो का" ही संगीत मैफिल ३२व्या पुणे नवरात्रौ महोत्सवात नवरात्रौच्या दसऱ्याच्या दिवशी श्री गणेश कला क्रीडा रंगमंच येथे रंगली. या कार्यक्रमाच्या संयोजिका व मुख्य प्रस्थात गायिका पल्लवी पत्की ढोले, रफी हबीब, विनोद नरवडे, इरफान, कविता जवळेकर या गायिकांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाचे निवेदन आकाश सोळंकी यांनी केले.

आज की रात, जाइए आप कहाँ, आवारा हूँ, प्यार करने वाले, सावन का महीना, चुरा लिया है दिल को, हवा के साथ साथ, रूप तेरा मस्ताना, दिवाना हुआ बादल, हे अपना दिल, प्यार हुआ इकरार , ये चाँद सा रोशन, सलामे इश्क मेरी जान, छुप गये सारे नजारे, निगाहें मिलाने को जी, तेरे जैसा यार कहाँ, कजरा मोहब्बत वाला, जय जय संतोषी माता अशा असंख्य गीतांना प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. अनेक गाण्यांना



वन्स मोरही मिळाला. संजय हिवराळे (ऑक्टोपॅड), अमन सय्यद (कीबोर्ड), अमर वानखेडे (कीबोर्ड), सचिन वाघमारे (फ्लूट), मुकेश धोत्रे (लाईव्ह ड्रम), महेश रिसवडकर(गिटार), अंकुश बोर्डे (ढोलक), महेंद्र कुमार (सेक्सोफोन) ह्यांनी वाद्यसांगत केली. पुणे नवरात्रौ महोत्सवाचे आयोजक अध्यक्ष आबा बागुल आणि पुणे नवरात्रौ महिला महोत्सवाच्या अध्यक्षा जयश्री बागुल यांनी कलाकारांचा सत्कार केला. दरवर्षी पुणे नवरात्रौ महोत्सवाचा समारोप 'कभी अलविदा ना केहना' या गीताने केला जातो. यावेळी मंचावरील सर्व कलावंत, पदाधिकारी व कार्यकर्ते आणि प्रेक्षकांनी एकत्रित 'कभी अलविदा ना केहना' हे एकत्र गाणे गायिले आणि भावपूर्ण वातावरणात ३२ व्या पुणे नवरात्रौ महोत्सवाची सांगता झाली. या प्रसंगी नंदकुमार बानगुडे, घनश्याम सावंत, रमेश भंडारी, नंदकुमार कोंढाळकर, अमित बागुल, हेमंत बागुल, सागर आरोळे आदि उपस्थित होते. घनश्याम सावंत यांनी आभार प्रदर्शन केले.

चिखलातून मुलीला वाचवण्यासाठी टायगरची धाडसी उडी!

■ पुणे (दै. संध्या)

मालिकांमधील काही दृश्ये प्रेक्षकांच्या मनावर कायमची छाप सोडतात. मात्र, पडद्यावर सहज वाटणाऱ्या अशा दृश्यांच्या मागे कलाकारांना किती मेहनत घ्यावी लागते, याची कल्पना अनेकांना नसते. सोनी सब वाहिनीवरील 'पुष्पा इम्पॉसिबल' या मालिकेतील टायगरच्या भूमिकेसाठी अभिनेता मुकुल हरीश याला असाच एक आव्हानात्मक अनुभव आला. एका लहान मुलीला वाचवण्यासाठी गटारातील चिखलात उतरून चित्रीकरण करावे लागले. विशेष म्हणजे, दृश्याचे चित्रीकरण पूर्ण झाल्यानंतर अंगावरील चिखल काढण्यासाठी त्याला जवळपास चार तास अंघोळ करावी लागली.

मालिकेच्या कथेत सध्या अनेक अनपेक्षित घडामोडी घडत आहेत. पुष्पा (कौर्णा पांडे) आणि टायगर (मुकुल हरीश) हे आई-मुलगा असल्याचे नुकतेच समोर आले आहे. या सत्याचा स्वीकार करताना दोघेही एकमेकांना समजून घेण्याचा आणि



एकमेकांच्या आयुष्यातील आपले स्थान शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांच्या नात्यात नवे बदल घडत असतानाच आगामी भागात टायगरसमोर एक धाडसी आव्हान उभे राहणार आहे. आगामी भागात एक लहान मुलगी गटारात पडते. तिचा जीव वाचवण्यासाठी टायगर क्षणाचाही विलंब न करता पुढे सरसावतो. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तो गटारात उडी मारतो आणि मुलीला वाचवण्याचा प्रयत्न करतो. या प्रसंगातून टायगरचे धाडस आणि दुसऱ्यांच्या मदतीसाठी पुढे येण्याची वृत्ती दिसून येणार आहे.

शाश्वत सौर ऊर्जेच्या वापरात महाराष्ट्र प्रगतीपथावर

गोपाल काबरा यांचे मत; सौर ऊर्जा प्रसारासाठीच्या 'सौर संवाद २०२६' यात्रेचा समारोप

■ पुणे (दै. संध्या)

"पारंपरिक ऊर्जास्रोतांवरील अवलंबित्व कमी करणे, अपारंपरिक ऊर्जेचा वापर वाढविणे आणि पर्यावरणपूरक विकासाला चालना देणे, ही काळाची गरज आहे. शाश्वत सौर ऊर्जेच्या वापरात महाराष्ट्र प्रगतीपथावर असून, सौर ऊर्जेच्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगार, उद्योजकता आणि आर्थिक विकासाच्या नव्या संधी निर्माण होत आहेत," असे मत 'जीके एनर्जी'चे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक गोपाल काबरा यांनी व्यक्त केले. ग्रामीण भागात सौर ऊर्जेचा वापर वाढल्यास ऊर्जा बचतीबरोबरच स्थानिक पातळीवर कौशल्यविकास आणि स्वयंरोजगारालाही चालना मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

सौर ऊर्जेचा प्रसार, या क्षेत्रातील व्यावसायिक संधींची माहिती आणि ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने गोपाल काबरा फाउंडेशन आणि जीके एनर्जी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सौर संवाद २०२६' यात्रेचा समारोप रविवारी पुण्यातील खराडी येथील मेफील्ड इस्टेटमध्ये झाला. १२ ते १८ ऑक्टोबरदरम्यान यात्रेद्वारे महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांमध्ये सौर ऊर्जेविषयी संवाद साधण्यात आला. अहिल्यानगर येथून सुरु झालेली ही यात्रा संभाजीनगर, नाशिक, धुळे, बुलढाणा, अमरावती, भंडारा, चंद्रपूर, वाशीम, नांदेड, लातूर, सोलापूर, कोल्हापूरमार्गे फिरून पुण्यात यात्रेचा समारोप झाला. गोपाल काबरा म्हणाले, "सौर ऊर्जेचा वापर वाढविण्यासाठी नागरिक, शेतकरी, उद्योजक आणि स्थानिक व्यावसायिकांपर्यंत या तंत्रज्ञानाची माहिती पोहोचविणे आवश्यक आहे. सौर



ऊर्जा हा केवळ वीज निर्मितीचा पर्याय नसून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारे आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे सौर ऊर्जेचा स्वीकार वाढविण्यासाठी व्यापक जनजागृती आणि तंत्रज्ञानाची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. यात्रेद्वारे सौर ऊर्जेच्या वापराचे फायदे तसेच या क्षेत्रातील व्यवसाय आणि रोजगाराच्या संधींबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रत्येक जिल्ह्यात या यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.""येत्या काळात एक हजारांहून अधिक उद्योजकांना सक्षम करण्याचा आमचा प्रयत्न असून, घरगुती छतावरील (रुफटॉप) सौर यंत्रणा, व्यावसायिक सौर प्रकल्प, सौर कृषिपंप, ऊर्जा साठवण, यंत्रणा बसविणे, देखभाल आणि वितरण अशा विविध क्षेत्रांतील संधींची माहिती देण्यात आली. तसेच विक्री, सेवा आणि तांत्रिक कामांसाठी स्थानिक पातळीवर व्यवसाय कसा सुरू करता येईल, याबाबत व्यावहारिक मार्गदर्शन केले," असे काबरा यांनी यावेळी सांगितले.

थोडक्यात पण महत्वाचे



नगरसेविका सुनीता चंद्रशेखर जाधव यांचा कामाचा धडाका

मुंबई : दैनिक संध्या

मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत समिती सदस्यांनी महानगरपालिकेने नगरसेवक निधीमध्ये वाढ करावी अशी जोरदार मागणी केली आहे. या अगोदर पालिका प्रशासन पालिकेचा कारभार पाहत होते.त्यामुळे नगरसेवकांना आपल्या प्रभागात कामे करताना निधी अपुरा पडत आहे.विक्रोळी कन्नमवार नगर ही म्हाडाची आशिया खंडातील सर्वात मोठी वसाहत आहे.येथे जुन्या इमारती पाडून टॉवर्स उभारली जात आहे.परंतू येथील पिण्याच्या पाणी लाईन,सिव्हरेज लाईन जुन्या आहेत.त्या मोठ्या करण्याची गरज आहे. कन्नमवार नगर येथील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नगरसेविका सुनीता चंद्रशेखर जाधव यांना विभागातील नागरिकांचा समस्या सोडविण्यासाठी नगरसेवक निधी अपुरा पडत आहे.परंतू आपल्या तुटपुंज्या नगरसेवक निधीतून त्या जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. शनिवार दिनांक २४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता इमारत क्र.२१३ ते २१७ येथील सिव्हरेज लाईन चोक अप होत असल्याने तेथे नवीन लाईन टाकण्याचे काम नगरसेविका सुनीता चंद्रशेखर जाधव यांच्या नगरसेवक निधीतून करण्याचा शुभारंभ करण्यात आला.या प्रसंगी नगरसेविका सुनीता चंद्रशेखर जाधव, उपविभाग प्रमुख चंद्रशेखर जाधव, समाजसेवक सी.के.सर्वगोड, महिला उपविभाग संघटिका वंदना बेंद्रे, विक्रोळी महिला विधानसभा संघटिका लिना सुर्यवंशी,शाखा प्रमुख प्रकाश पुजारे, उपशाखा प्रमुख अमित कांबळे, उपशाखा प्रमुख शरद दोडके, उप शाखासंघटिका छाया कारंडे, निरीक्षक सुशीला रायकर, गटप्रमुख मंजू जगताप, गटप्रमुख रेखा जाधव,श्रद्धा मुरकर, राहुल शिरतावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणीत सात लाख परीक्षार्थी सहभागी

मुंबई : दैनिक संध्या

केंद्र पुरस्कृत 'उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम' अंतर्गत राज्यभरात पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी (एफएलएनएटी) यशस्वीरीत्या घेण्यात आली. या परीक्षेत सुमारे सात लाख परीक्षार्थी सहभागी झाले असून उत्तीर्ण होणाऱ्या नवसाक्षरांना केंद्र शासनाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागाकडून प्रमाणपत्र आणि गुणपत्रक देण्यात येणार आहे. तसेच त्यांना पुढील शिक्षणासाठी इयत्ता तिसरी, पाचवी, आठवी, दहावी आणि बारावीच्या परीक्षांना बसता येणार असल्याची माहिती शिक्षण संचालक (योजना), कृष्णकुमार पाटील यांनी दिली आहे. असाक्षर व्यक्तींना साक्षर करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

चाकण उद्योग पंढरीत विकास कामांचा बट्ट्याबोळ

सांडपाणी व कच-यामुळे वाढलाय बकालपणा

■ चाकण (दै. संध्या)

विकास कामांच्या नावाखाली विविध प्रकल्पांचा दट्ट्या खेड तालुक्याच्या वाट्याला आला असताना प्रत्यक्षात मात्र चाकण उद्योग पंढरीत विकास कामांचा बट्ट्याबोळ झाला आहे. रस्त्यालगत साचलेले सांडपाणी आणि कचऱ्यामुळे सुटलेली दुर्गंधी यामुळे उद्योग नगरीत बकालपणा वाढत चालला आहे. औद्योगिक वसाहतीमुळे चाकण शहराचे नाव जगाच्या नकाशावर झळकत असताना प्रत्यक्षात मात्र चाकण एमआयडीसीत पायाभूत सुविधा कोलमडल्या आहेत. चाकण आणि परिसरातील औद्योगिक वसाहतीत कचरा व्यवस्थापनाचा प्रश्नही दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. स्थानिक रहिवासी, उद्योग, कंपन्यांचा फटका चाकण औद्योगिक वसाहतीला बसत आहे. उद्योगनगरीत निर्माण होणारा घनकचरा, रासायनिक कचरा, प्लॅस्टिक कचरा, आणि इतर कचऱ्याचे नियोजन झालेले नाही. विविध गावातील नागरिक कचरा अगदी मुख्य मार्गावर, चाकण तळेगाव चौक तसेच चाकण शिक्रापूर मार्गावर फेकून देतात.

चाकण लगतच्या कोणत्याही रस्त्यावर, वाड्या वस्त्यांवर रस्त्याने ये जा करणारे नागरिक कचरा इतरत्र कुठेही फेकत असल्याने जागोजागी वर्दळीच्या ठिकाणी कचऱ्याचे मोठ्या प्रमाणात ढिग दिसून येत आहेत. कचरा व कचऱ्यातून निघणाऱ्या दुर्गंधीमुळे पर्यावरण आणि आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अर्थात एमआयडीसी अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या चाकण औद्योगिक वसाहतीत रस्त्याने ये जा करणारे नागरिक व कामगार रस्त्यालगत कचरा फेकत असल्याने जागोजागी कचऱ्याचे ढीग पडले आहेत. त्यासाठी कचरा उचलण्याची व्यवस्था अधिक सक्षम आणि भक्कम करणे गरजेचे आहे. चाकण एमआयडीसीत प्रवेश करताना सर्वप्रथम राणूबाई मळा, खराबवाडी, वाघजाई नगर, महाळुंगे इंगळे, खालूंब्रे, सावरदरी, आंबेठाण, बिरदवडी आदी गावांच्या हद्दीत रस्त्यालगत कचऱ्याचे मोठमोठे ढिग साचलेले दिसत आहेत. खराबवाडी लगतच्या वाघजाईनगर रस्त्यावर सांडपाणी साचल्याने दुचाकी चालक घसरून गंभीर जखमी झाले आहेत. जनावरांना चालताना लाज वाटेल, असे रस्ते झाले आहेत. या भागात सांडपाणी व कचऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात बकालपणा वाढीस लागला आहे. नागरिकांना दररोज वाहतूक कोंडी, कचरा समस्या, सांडपाणी यांच्याशी सामना करावा लागतो. चाकण भागात दिवसेंदिवस वाढत्या नागरिकीकरणामुळे व विस्तारत्या उद्योग नगरीमुळे कचऱ्याची समस्या अत्यंत जटील होत चालली असून, याकडे मात्र दुर्लक्ष केले जात आहे. काही ठिकाणी एमआयडीसी भागात रस्त्यालगत कचरा जाळला जात असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.



रस्त्यांवर गटारगंगा

"बहुतांशी कंपन्यांमध्ये सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी जागा उपलब्ध नाही. सुरक्षितता बाळगली नसल्याने कंपन्यांमधून बाहेर आलेले पाणी थेट रस्त्याला आल्याने गटारगंगा तयार झाली आहे."

"चाकण एमआयडीसीत आद्ययावत कचरा प्रकल्प होणार आहे, अशी फक्त चर्चा झाली. कचरा प्रकल्प अद्याप झाला नसून कागदी घोडे नाचविण्यातच प्रशासन व्यस्त दिसत आहे. कचरा प्रकल्प कागदावरच राहणार की प्रकल्प सत्यात उतरणार, हे मात्र समजून येत नाही."
- विनोदभाऊ महाळुंगकर पाटील, उद्योजक.

श्री महालक्ष्मी मंदिरातर्फे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त अन्नकोट

■ पुणे (दै. संध्या)

श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग तर्फे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त मंदिरात अन्नकोट साकारण्यात आला होता. यावेळी श्री महालक्ष्मी, श्री महासरस्वती आणि श्री महाकाली देवीला ५६ भोगाचा अन्नकोट दाखविण्यात आला. कोजागिरी पौर्णिमेनिमित्त मंदिरात भव्य भजन संध्या आणि महाआरतीचे देखील आयोजन करण्यात आले. ट्रस्टचे प्रमुख संस्थापक आणि विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, विश्वस्त व उत्सव प्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल, विश्वस्त भरत अग्रवाल, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर, नारायण काबरा, राजेश सांकला, रमेश पटोदिया, राजकुमार चमडीया, निलेश लद्दड यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी यंदाच्या नवरात्र उत्सव आणि कोजागिरी कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल म्हणाल्या, विविध प्रकारच्या मिठाई, नमकीन यांसह ५६ प्रकारचे पदार्थ हा अन्नकोटामध्ये मांडण्यात आले. हा भोग तिन्ही देवींना दाखविण्यात आला. याशिवाय मंदिरात दुपारी हवन, तसेच सायंकाळी भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये महिला देवीभक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कोजागिरी पौर्णिमेनिमित्त मंदिरात आकर्षक सजावट देखील करण्यात आली. सर्व भक्तांना प्रसाद देण्यात आला व कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने दूध प्रसाद सुद्धा देण्यात आला.



अस्पी चिल्ड्रन्स ॲकॅडमीची यशाची हॅट्ट्रिक!

एज्युकेशन वर्ल्ड इंडिया स्कूल रँकिंगमध्ये भारतात १७वा, महाराष्ट्रात ७वा; पालघर जिल्ह्यात प्रथम क्रमांक

■ भिवंडी (दै. संध्या)

पालघर जिल्ह्यातील उचाट शिक्षण संस्था संचालित अस्पी चिल्ड्रन्स अॅकॅडमी या इंग्रजी माध्यमाच्या शाळेने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. EducationWorld India School Rankings या प्रतिष्ठित मानांकनामध्ये शाळेने सलग तिसऱ्या वर्षी पुरस्कार प्राप्त करून यशाची हॅट्ट्रिक साधली आहे. भारतातील विशेष कामगिरी करणाऱ्या ५० खासगी शाळांमध्ये शाळेने देशात १७वा, महाराष्ट्रात ७वा आणि पालघर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. शैक्षणिक गुणवत्ता, प्रभावी व्यवस्थापन, शिस्त आणि अत्यंत माफक शुल्कात दर्जेदार शिक्षण देण्याच्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. जागतिक स्तरावर प्रसिद्ध होणाऱ्या EducationWorld मासिकाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावर शाळांचे मूल्यमापन करून हे मानांकन दिले जाते. शाळेच्या या यशामागे उचाट शिक्षण संस्थेचे सातत्यपूर्ण सहकार्य, भक्कम पाठबळ, शिक्षकवृंदाचे समर्पित कार्य, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मेहनत आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती यांचा मोलाचा वाटा आहे. शनिवार, २४ ऑक्टोबर २०२६ रोजी दिल्लीतील द पुलमन, एरोसिटी येथे आयोजित भव्य पुरस्कार सोहळ्यात शाळेचे आधारस्तंभ किरण पटेल, मुख्याध्यापक उमेश महाडीक आणि जनसंपर्क अधिकारी भूपेंद्र शाह यांनी शाळेच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला. सलग तीन वर्षे राष्ट्रीय स्तरावर मानांकन मिळविणे ही शाळेसाठी अभिमानाची बाब असून, या यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीला नवी प्रेरणा मिळाली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल उचाट शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी वेतन द्या!

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे एसटी प्रशासनाला निर्देश

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील (एसटी) सुमारे ८३ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड व्हावी, यासाठी नोव्हेंबर महिन्याचे वेतन दिवाळीपूर्वी अदा करण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत.

एसटी महामंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन दर महिन्याला साधारणतः ७ ते १० तारखेदरम्यान अदा केले जाते. मात्र, यंदा ६ नोव्हेंबरपासून दिवाळी सणाला सुरुवात होत असल्याने कर्मचाऱ्यांना सणापूर्वीच वेतन मिळणे आवश्यक आहे. दिवाळीच्या सणासाठी कुटुंबीयांसह खरेदी, घरगुती खर्च आणि इतर नियोजन करता यावे, यासाठी कर्मचाऱ्यांच्या हातात वेळेत पगार पडणे महत्त्वाचे आहे. ही बाब लक्षात घेऊन मंत्री सरनाईक यांनी प्रशासनाला वेतनासाठी आवश्यक ती पावले उचलण्याच्या सूचना दिल्या आहेत. दिवाळीपूर्वी वेतन देण्यासाठी एसटी महामंडळाच्या अर्थ व नियोजन विभागाने तातडीने शासनाकडे पाठपुरावा करावा. कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी आवश्यक असलेले अनुदान तसेच मागील महिन्यातील विविध प्रवासी सवलत योजनांच्या प्रतिपूर्तीपोटी शासनाकडून मिळणारी प्रलंबित रक्कम वेळेत उपलब्ध होण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असेही निर्देश देण्यात आले आहेत.



एसटी महामंडळाच्या आर्थिक अडचणींमुळे कर्मचाऱ्यांच्या सणाच्या आनंदावर विरजण पडू नये, यासाठी प्रशासनाने या विषयाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. शासनाकडून आवश्यक निधी उपलब्ध होण्यासाठी समन्वय साधून वेतन वितरणाचे नियोजन करावे आणि दिवाळीपूर्वी कर्मचाऱ्यांना पगार मिळेल, या दृष्टीने दक्षता घ्यावी, असे सरनाईक यांनी स्पष्ट केले.

चाकण येथील वधू वर परिचय मेळाव्याची जोरदार तयारी

■ चाकण (दै. संध्या)

माळी समाजातील विवाहेच्छुक युवक-युवतींना विवाहासाठी योग्य जोडीदार निवडता यावा, तसेच समाजातील कुटुंबांना एकमेकांशी परिचय साधण्याची संधी मिळावी, या उद्देशाने श्री संत सावता माळी वधू-वर सूचक मंडळ यांच्या वतीने चाकण येथे रविवारी (दि. १ नोव्हेंबर) आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय माळी समाज वधू-वर परिचय मेळाव्याची जोरदार तयारी करण्यात आली आहे. येथील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात वरील नियोजित दिवशी सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून समाजातील विवाहेच्छुक वधू-वरांना आपला परिचय करून देण्याची, तसेच पालकांना आपल्या मुला-मुलींसाठी योग्य स्थळ शोधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. राजेंद्र घुमटकर, शोभा शेवकरी, मीना गोरे, गोरक्षनाथ कांडगे, बबनराव टिळेकर, ज्योती वाघ, मंगल गोरे, मंगल जाधव, मंगल शेवकरी, पल्लवी लेंडघर, रमेश वाघ आदींनी या परिचय मेळाव्याचे आयोजन केले आहे.



नाव नोंदणीसाठी राजेंद्र घुमटकर, शोभा शेवकरी, स्वाती झगडे, जयश्री खेडकर, गीताताई गवते, स्वाती गवते, मनीषा गवते, रूपाली गवते, अर्जुन गोरे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी केले आहे. वधु वर परिचय मेळाव्याचे उदघाटन आमदार बाबाजी काळे, दिलीप मोहिते, रामभाऊ कांडगे, शांताराम घुमटकर, महेंद्र गोरे, डॉ. अंकुश जाधव आदींच्या हस्ते होणार आहे. उद्योजक भरत कानपिळे, नगरसेविका ॲड. वर्षा शेवकरी, नथूभाऊ गोरे व रामदास जाधव, मंगेश कांडगे आदींच्या विशेष सहकार्याने हा कार्यक्रम होणार आहे.

मानव संसाधन परिषदेला टॅलेंटकॉर्प लिमिटेडचे प्रायोजकत्व



■ चाकण (दै. संध्या)

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट (एन. आय. पी. एम.) यांच्या वतीने सातारा येथे आयोजित पश्चिम विभागीय मानव संसाधन परिषदेला चाकण येथील टॅलेंटकॉर्प सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड (टीएसपीएल ग्रुप) यांनी प्रायोजक म्हणून सहकार्य केले आहे. सातारा येथील कै. वसंतराव चव्हाण सभागृहात ही परिषद पार पडली. 'एच. आर. कॅलिडोस्कोप २०२६' अशी या परिषदेची संकल्पना असून, 'विकसित भारताच्या शतकाकडे वाटचाल करताना मानवी भांडवलाचा प्रवास घडविणे' हा या परिषदेचा मुख्य विषय होता. मानव संसाधन क्षेत्रातील तज्ज्ञ, औद्योगिक क्षेत्रातील प्रतिनिधी, व्यवस्थापन क्षेत्रातील व्यावसायिक आणि विविध संस्थांमधील निर्णयकर्ते यांना एकत्र आणून ज्ञानाची देवाणघेवाण करणे, उद्योगांच्या बदलत्या गरजांवर चर्चा करणे आणि भविष्यातील कुशल मनुष्यबळाच्या विकासाला चालना देणे हा या परिषदेचा प्रमुख उद्देश होता. या परिषदेस आठशेहून अधिक सहभागी उपस्थित राहण्याची अपेक्षा टॅलेंट कॉर्प लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. मेहबूब सैय्यद यांनी वर्तवली होती. टॅलेंटकॉर्प सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड ही संस्था मनुष्यबळ व्यवस्थापन, रोजगारनिर्मिती, भरती प्रक्रिया, कंत्राटी मनुष्यबळ पुरवठा, प्रशिक्षण आणि कौशल्य विकास या क्षेत्रांत कार्यरत आहे. शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजना, विविध कौशल्य विकास उपक्रम आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमातून उद्योगांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे तसेच युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे यासाठी संस्था प्रयत्नशील आहे.

"मानव संसाधन क्षेत्रातील नवीन संकल्पना, उद्योगांच्या अपेक्षा आणि भविष्यातील रोजगारविषयक आव्हाने यांवर विचारविनिमय करण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. टॅलेंट कॉर्प संस्थेचा इतरांनी आदर्श घ्यावा."
-डॉ. मेहबूब सैय्यद, उद्योजक चाकण.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. लक्ष्मण किसन गाडे रा. सोमतवाडी, कुसुर, ता. जुन्नर, जि. पुणे ४१० ५०२ येथे राहावयास असून, सदरची मिळकत आमचे अशिलानी कायमखुश खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले आहे व विसार रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचा भरदसा यांनी आमचे अशिलास दिलेला आहे. खालील परिशिष्टमध्ये वर्णन केलेल्या मिळकती संबंधी कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध कुलमुखत्यार, करारमदार, साठेखत, विसास्पावती, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षिस, लोन, लीज, चोळी बांगडी, ताबा वहिवाट कोर्टकारवाई वगैरे असल्यास त्यांनी प्रस्तुत नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाचे आत अस्सल कागदपत्रानिशी आमची खस्त्री प्रटवुन द्यावी व त्याची लेखी पोहोच द्यावी. तसे न केल्यास सदर मिळकती मध्ये असलेल्या हक्क त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिलेला आहे असे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार ऐकुण घेतली जाणार नाही.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन - तुकडी व जिल्हा परिषद पुणे पोट तुकडी तालुका जुन्नर, पंचायत समिती जुन्नर पैकी ग्रामपंचायत सोभतवाडी येथील व मे. दुय्यम निबंधक सो. जुन्नर यांचे हद्दीतील गाव सोमतवाडी येथील शेतजमिन मिळकत.

गाव मौजे सोमतवाडी येथील शेतजमिन -

गट नं.	क्षेत्र हेक्टर - आर.	आकार रुपये - पैसे
११/१	२ - ०१	३ - १६
पोट खराबा	० - ८१	
एकुण क्षेत्र	२ - ८२	३ - १६

यापैकी लिहुन देणार श्री. लक्ष्मण किसन गाडे यांचे नावाने खाते क्र. ४३१ यावरील शेतजमीन पुढीलप्रमाणे

गट नं.	क्षेत्र हेक्टर - आर.	आकार रुपये - पैसे	पुर्व	दक्षिण	पश्चिम	उत्तर
११/१ पैकी	० - ३१	० - ४१	गट नं. ११/१ पैकी सुनिल मो. गाडे	वसंत बजाबा चतुर	गट नं ११/१ पै. रामदास कि. गाडे	गट नं ११/१ पैकी आश्रमशाळा
पोट खराबा	० - २१					
एकूण क्षेत्र	०-५२					

लिहुन देणार यांनी विक्री केलेले क्षेत्र पुढीलप्रमाणे -

गट नं.	क्षेत्र हेक्टर - आर.	आकार रुपये - पैसे
११ पैकी	०-३१	०-४१
पोट खराबा	० - ०८	
एकुण क्षेत्र	० - ३९	० - ४१

यांसी चर्तुसिमा पुढीलप्रमाणे -

पुर्व : गट नं. ११/१ पैकी सुनिल मोहन गाडे यांचे क्षेत्र
दक्षिण : वसंत बजाबा चतुर यांचे क्षेत्र
पश्चिम : गट नं. ११/१ पैकी लिहुन देणार यांचे उर्वरित क्षेत्र
उत्तर : गट नं. ११/१ पैकी आश्रम शाळा

येणेप्रमाणे मिळकती त्यातील सर्व तंगदभूत वस्तूसहित तसेच सदर जागेमध्ये येणेजाण्याचे व वहिवाटीचे हक्कासहित व इजमेंटरी राईट सह दरोबस्त मिळकतीत कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार राखून न ठेवता मिळकत. येणेप्रमाणे जाहिर नोटीस

दि : १०/१०/२०२६
ठिकाण : जुन्नर

सही/-
श्री. तुषार दिनकर गायकवाड (ॲडव्होकेट)
बी. ए. एल. एल. बी
पत्ता - गणेश पेठ, जुन्नर ता.जुन्नर, जि. पुणे
संपर्क. ७९७२६०८७२

थोडक्यात पण महत्वाचे



पिंपरी चिंचवडच्या 'कलाकार कट्टा'ची दिमाखदार रंगतदार वर्षपूर्ती

चिंचवड : दैनिक संध्या

दिनांक -२४ ऑक्टोबर रोजी मा. लोकनेते भाऊसाहेब भोईर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'कलाकार कट्टा'ने यशस्वी वर्षपूर्तीचा टप्पा गाठला. नवोदितांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे आणि सांस्कृतिक क्षेत्रातील प्रतिभेला नवी ओळख मिळावी, या उद्देशाने सुरू झालेल्या या उपक्रमाच्या बाराव्या पुष्पात विविध कलाविष्कारांची रंगतदार मेजवानी रसिकांना अनुभवायला मिळाली. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखेच्या वतीने शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी पंडित पद्माकर कुलकर्णी कलादालन, प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. 'वर्षपूर्ती हक्काच्या मंचाची, नांदी नव्या पर्वाची!' ही या सोहळ्याची संकल्पना वर्षभरातील यशस्वी वाटचालीचे प्रतीक ठरली. कार्यक्रमात कराओके गायनात शालन पायगुडे, कविता सादरीकरणात शशिकला देवकर, आकाश थिटे, आसाराम कसबे यांनी झांज आणि ढोलकी या वाद्याची माहिती दिली आणि ऋषिकेश गायकवाड आणि ओंकार गायकवाड यांनी वाद्याचे सादरीकरण केले. मधुषा भागवत यांच्या चित्रांचे सर्व रसिकांनी कौतुक केले, भारूडमध्ये राजश्री वाघमारे, जोगवा सादरीकरणात माधुरी डिसूजा व शीला पाटील, बोधकथेत राज अहेरराव, पियानो वादनात श्रिजा पोवार, अभिवाचनात जयश्री श्रीखंडे, लोकवाद्यात आसाराम कसबे, तसेच नाट्यछटांमध्ये सुखदा शिंदे, देवज दीक्षित आणि दिविजा दीक्षित यांनी आपापल्या कलागुणांचे दर्शन घडवले. विविध कलाप्रकारांतील या सादरीकरणांनी कार्यक्रमात उत्साह आणि वैविध्य निर्माण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गौरी लोंढे यांनी केले. त्यांनी 'कलाकार कट्टा'च्या वर्षभरातील वाटचालीचा आढावा घेत या उपक्रमामागील संकल्पना आणि उद्देश स्पष्ट केला. या कार्यक्रमाचे राजेंद्र बंग, पंकज चव्हाण, रवी दामोदरे, आकाश थिटे आदींनी संयोजन केले. सूत्रसंचालन सीमा गांधी यांनी केले, तर प्रकाश ढवळे यांनी आभार व्यक्त केले. एका संकल्पनेतून सुरू झालेला हा प्रवास बारा पुष्पांच्या माध्यमातून अनेक कलाकारांच्या कलागुणांना व्यासपीठ देणारा ठरला. कलाकारांना प्रोत्साहन, रसिकांची दाद आणि नव्या प्रतिभेला मिळालेली संधी ही या वर्षपूर्तीची वैशिष्ट्ये ठरली.

खासगी रुग्णालयांमध्ये दरपत्रक दर्शनी भागात ठळकपणे लावा : वाघेरे

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी चिंचवड शहरातील सर्व खासगी रुग्णालयांमध्ये रुग्ण सेवांचे दरपत्रक हे ठळक अक्षरात दर्शनी भागात लावण्याबाबत कडक आदेश देण्यात यावेत. तसेच सेवा दर न लावणाऱ्या खासगी रुग्णालये तसेच छोटे दवाखाने यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते रमेश वाघेरे यांनी निवेदनाद्वारे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ विजय सुर्यवंशी यांच्याकडे केली आहे. खासगी रुग्णालये हे लुटीचे साधन झाले आहे. एखाद्या पेशंटचे बील हे लाखोंच्या घरात काढले जाते. त्यामुळे रुग्णांची अवस्था वाईट झाली आहे. अनेक रुग्णालये मनमानी पद्धतीने बील काढत आहेत. जर रुग्णसेवांचे दर दर्शनी भागात ठळकपणे लावले तर रुग्णांच्या नातेवाइकांना सोयीचे होईल त्यांना जास्तीचे बील येणार नाही. व त्यांची होणारी फसवणूक थांबेल. त्यामुळे सर्व खासगी दवाखाने, रुग्णालयांमध्ये दरपत्रक लावण्याची सक्ती करण्यात यावी अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते रमेश वाघेरे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

५०० कोटी देणाऱ्या भाजप पदाधिकाऱ्यांना तात्काळ अटक व्हावी : रविराज काळे



चिंचवड : दैनिक संध्या

मनोज जरांगे पाटील यांनी सादर केलेली ऑडिओ क्लिप आणि भाजप-एकनाथ शिंदे यांच्यातील ५०० कोटींच्या व्यवहाराचा आरोप हा राजकीय वाद नाही. तो मराठा समाजाच्या स्वप्नांचा प्रश्न आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणतात, "ना घेतले, ना दिले." मग ही क्लिप कुठून आली? या क्लिपमध्ये भाजपचे कोणते आमदार व पदाधिकारी सहभागी होते, ५०० कोटी रुपये कोणी, कसे आणि का दिले हे जनतेसमोर आले पाहिजे. या प्रकरणात मनोज जरांगे पाटील यांनीही हे स्पष्ट करावे की ही ऑडिओ क्लिप त्यांना कधी, कुठून आणि कशी मिळाली; तिचा स्रोत काय आहे. जनतेच्या विश्वासाचा प्रश्न असल्याने त्यांनीही सर्व तपशील खुले करावेत. आम आदमी पार्टीची मागणी स्पष्ट आहे — एकनाथ शिंदे, श्रीकांत शिंदे आणि ५०० कोटी रुपये देणाऱ्या भाजपच्या सर्व पदाधिकाऱ्यांना तात्काळ अटक व्हावी आणि या काळ्या पैशांची न्यायालयीन देखरेखीखाली स्वतंत्र चौकशी व्हावी. ऑडिओ क्लिपची सत्यता स्वतंत्र यंत्रणेमार्फत तपासावी. अन्यथा, आम आदमी पार्टी संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलन उभारेल.

कालिदासाचे शिल्प अधिकृत व्हावे : शरद पवार

'कालिदास सन्मान पुरस्कार २०२६' जाहीर - गोविंद वाकडे



■ पिंपरी (दै. संध्या)

भारतात अजूनही कालिदासाचे सर्वमान्य शिल्प नाही. परंतु हे शिल्प अधिकृत व्हावे असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितले. नुकतेच मुंबईत शरद पवार यांच्या हस्ते कालिदास स्मृतिचिन्हाचे अनावरण करण्यात आले. यावेळी शिल्पकार संजय खिलारे, महाकवी कालिदास कला निकेतन संस्थेचे अध्यक्ष गोविंद वाकडे, विश्वस्त अश्विनी सातव आदी उपस्थित होते.

महाकवी कालिदास कला निकेतन संस्थेतर्फे यावर्षी महाराष्ट्रात प्रथमच महाकवी कालिदासांच्या सर्व साहित्यकृतींच्या रंगावृत्तींचा "पुणे कालिदास महोत्सव २०२६" जुलै २०२६ पासून पुण्यात सुरू झाला आहे. या विषयाची माहिती आणि संस्थेच्या पुरस्कार सोहळ्याच्या आयोजनाची माहिती शरद पवार यांना देण्यात आली अशी माहिती गोविंद वाकडे यांनी दिली. "पुणे कालिदास महोत्सव २०२६" सहा महीने चालणार असून या महोत्सवात आतापर्यंत मेघदूत ऋतु संहार, आषाढाचा पहिला दिवस ही नाटके सादर झाली आहेत. शाकुंतल, विक्रम उर्वशी, मालविक - अग्निमित्र, कुमार संभव आणि तीन भागातील महानाट्य रघुवंश सादर होणार आहेत. या महोत्सवानिमित्त यावर्षी पासून संस्थेने साहित्य आणि रंगभूमीवर विशेष योगदान दिलेल्या गुणीजनांचा गौरव करण्यासाठी "कालिदास सन्मान पुरस्कार" सुरू केले असून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गोविंद वाकडे यांनी आज हे पुरस्कार जाहीर केले आहेत. सोमवारी (दि. २६ ऑक्टोबर) दुपारी १२:३० वाजता, माधवराव पटवर्धन सभागृह, महाराष्ट्र साहित्य परिषद, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे येथे हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे. पद्मश्री गिरीश प्रभुणे, जेष्ठ नेते उल्हासदादा पवार, सिने अभिनेत्री चिन्मयी सुमित, मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती शाखा उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांच्या हस्ते आणि पिंपरी चिंचवडचे आयुक्त डॉ. विजय कुमार सूर्यवंशी, महमेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डिकर,आळंदी देवस्थान विश्वस्थ कबीर बुवा उपाख्य हभप चैतन्य महाराज लोंढे आणि जेआरबी इन्फ्राचे व्यवस्थापकीय संचालक महेश भालेराव यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे अशी माहिती महाकवी कालिदास कला निकेतन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गोविंद वाकडे यांनी प्रसिद्धीस दिली आहे. कालिदास नाट्य गौरव सन्मान मधू जोशी, चं. प्र. देशपांडे, प्रा. दिलीप जगताप, दीपक रेगे, चेतन दळवी, शरद सावंत (रंगभूषाकार); सर्वोत्कृष्ट व्यवसायिक दिग्दर्शक भालचंद्र कुबल आणि अभिजित पानसे (घाशीराम कोतवाल); सर्वोत्कृष्ट सृजनशील दिग्दर्शक स्वागत थोरात (अपूर्व मेघदूत); सर्वोत्कृष्ट नाट्यग्रंथ नाटक (नाटक रंगभूमीची परिभाषा अरुण कदम); सर्वोत्कृष्ट युवा अभिनेता (मराठी) प्रितेश मांजलकर; सर्वोत्कृष्ट युवा अभिनेता (हिन्दी) मनोज डाळिंबकर (नाटक पतझड); सर्वोत्कृष्ट कालिदास नाट्य अभिनेत्री पर्ण पेठे - आषाढातील एक दिवस); लक्षवेधी युवा अभिनेत्री अश्विनी कासार, सोनाली मगर, अमृता ओंबळे; कैलास वाघमारे; सर्वोत्कृष्ट नाट्य वेशभूषा चैत्राली डोंगरे.

कालिदास साहित्य गौरव सन्मान सर्वोत्कृष्ट चिंतनशील कादंबरी - गुरु, नितीन कोतापल्ले; सर्वोत्कृष्ट सामाजिक कथा - माऊली ढाबा अविनाश गायकवाड; सर्वोत्कृष्ट कथा संग्रह कोरिओग्राफर - सतीश तांबे; सर्वोत्कृष्ट संपादन - खेळ नियतकालिक - मंगेश नारायणराव काळे; सर्वोत्कृष्ट अनुवाद सीमांच्या पलीकडचे - नेहा भांडारकर; सर्वोत्कृष्ट सम्यक स्त्रीवादी कविता - धरणाच्या तळाशी - सारिका; सर्वोत्कृष्ट चिंतनशील कविता - चित्रक - श्रीकांत ढेरंगे; कालिदास कला संवर्धक सन्मान - महामेट्रो व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डिकर, उद्योजक महेश भालेराव, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय कुमार सूर्यवंशी आणि हभप चैतन्य महाराज लोंढे (कबीर बुवा) यांना जाहीर झाला आहे.



काँग्रेसच्या ठिय्या आंदोलनाचा चौथा दिवस

■ संविधान शिल्प तोडफोड प्रकरणात किरकोळ गुन्हा दाखल करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न?- शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे

■ चिंचवड/सांगवी (दै. संध्या)

सांगवी येथील संविधान चौकातील भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे शिल्प काढून टाकण्यात आल्याच्या आणि स्मारकाच्या चौथऱ्याची मोडतोड करण्यात आल्याच्या निषेधार्थ काँग्रेसच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या बेमुदत ठिय्या आंदोलनाचा आज (दि.२५) चौथा दिवस असून संविधानाच्या प्रास्ताविकेचे शिल्प पूर्ववत बसवावे, तसेच या प्रकरणात सहभागी असलेल्या संबंधित नगरसेविका तृप्ती संतोष कांबळे यांच्यावर गुन्हा दाखल करावा. राज्यकर्त्यांच्या दबावाखाली पोलिसांनी पती संतोष कांबळे यांच्यावर किरकोळ स्वरूपाचा गुन्हा दाखल करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला आहे अशी टीका पिंपरी-चिंचवड शहर काँग्रेसचे अध्यक्ष नरेंद्र बनसोडे यांनी केली आहे. प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहावे, अन्यथा त्याचे राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक परिणाम भोगावे लागतील, असा इशारा त्यांनी दिला आहे. यावेळी बनसोडे म्हणाले की, सांगवीतील संविधान चौकामध्ये असलेल्या भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेच्या शिल्पाची कथितरीत्या बेकायदेशीरपणे मोडतोड करून ते काढून टाकण्यात आले. या घटनेमुळे संविधानावर प्रेम करणाऱ्या नागरिकांच्या भावना दुखावल्या आहेत. त्यामुळे केवळ निषेध व्यक्त करून थांबणे पुरेसे नसून, संबंधितांवर कायदेशीर कारवाई होणे आणि प्रास्ताविकेचे शिल्प पूर्वीप्रमाणे सन्मानपूर्वक पुन्हा बसवणे आवश्यक आहे.संविधानाची प्रास्ताविका ही हजारो-लाखो नागरिकांच्या सन्मानाचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे. त्यामुळे या शिल्पाची पुनर्स्थापना ही आंदोलनाची सर्वांत महत्त्वाची मागणी आहे.संबंधित नगरसेविका, त्यांचे पती आणि या कृत्यात सहभागी असलेल्या इतरांवर गुन्हे दाखल व्हावेत.

स्वच्छ ऊर्जा क्षेत्रांतील संधींचा शोध घ्या - संतोष खैरनार

'टेडएक्स - पीसीयू २०२६' मोठ्या उत्साहात संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)

नव संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी जिज्ञासा, धैर्य, शिस्त आणि सातत्यपूर्ण विचारमंथन आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी प्रचलित चौकटींच्या पलीकडे जाऊन विचार करावा आणि स्वच्छ ऊर्जा व सेमीकंडक्टर यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांतील संधींचा शोध घ्यावा असे मार्गदर्शन कार्पोरेट क्षेत्रातील तज्ञ आयनॉक्स विंडचे अध्यक्ष संतोष खैरनार यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे 'टेडएक्स - पीसीयू २०२६' या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी खैरनार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पीसीयूचे कुलपती तथा पीसीईटी विश्वस्त हर्षवर्धन पाटील, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट चे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, व्यवस्थापन समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीयू चे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सहभागी व्याख्याते व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पुणे इंटरनॅशनल सेंटरचे उपसंचालक हृषिकेश धनाडे, पीसीयूचे इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड इंडस्ट्री रिलेशन्स विभागाचे संचालक डॉ. प्रणव चरखा, विद्यार्थी विकास व कल्याण विभागाच्या संचालिका डॉ. अंजू बाला, कॅप जेमिनी कंपनीचे मुख्य तंत्रज्ञान अधिकारी कार्यकारी उपाध्यक्ष मुकेश जैन, कृत्रिम बुद्धिमत्ता मार्गदर्शक सागर बाबर, मराठी स्टँड-अप कॉमेडियन सौरभ भोसले, ग्लोबल लीन चेंज एजंट आणि चेंज हॅकर सारिका खारबंदा, मारवाडी युनिव्हर्सिटी चे सहाय्यक प्रा. राहुल त्रिवेदी, मुंबई डबेवाला असोसिएशन अध्यक्ष सुभाष तळेकर, वरिष्ठ कृत्रिम बुद्धिमत्ता आर्किटेक्ट आरशद देवानी, एच आर तज्ञ पुलकित हांडा भारतीय माजी लष्कर अधिकारी चिन्मय महाले आदींनी 'टेडेक्स पीसीयू २०२६' कार्यक्रमात मार्गदर्शन केले. पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले की, पिंपरी चिंचवड विद्यापीठाने टेड एक्सचे पहिल्यांदाच आयोजन केले होते. या कार्यक्रमात उद्योग क्षेत्रातील तज्ञ, नवोन्मेषक, शिक्षण तज्ज्ञ यांनी अमूल्य मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि सकारात्मक परिवर्तनाची क्षमता सिद्ध करण्यासाठी अशा आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांचा उपयोग होईल असे डॉ. देसाई म्हणाले.

पीसीयू कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे म्हणाले की, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवांच्या माध्यमातून शिकण्याच्या संधी पीसीयू उपलब्ध करून देते.




प्रत्येकाने 'श्रीकृष्ण' होण्याची वेळ आली - डॉ. संजय उपाध्ये

■ सदगुणांचा अतिरेक करून गप्प बसायचे नाही - डॉ. संजय उपाध्ये

■ विराट हिंदू मेळाव्यात पुरस्कार वितरण

■ पिंपरी, पुणे (दै. संध्या)

अधर्माची वाढ झाल्यानंतर मी जन्म घेतो असे श्रीकृष्णाने सांगितले असले तरी, हिंदूंनी आता सदगुणांचा अतिरेक करून गप्प बसायचे नाही, संख्याबळ दाखवणे ही आजची गरज आहे. बुद्धिवादाच्या नादामध्ये साहित्यिक बुद्धिभेद करीत आहेत. अस्तित्वाचा मुद्दा उपस्थित झाला, तर विवेक बाजूला ठेवावा लागेल. हिंदूंनो एकत्र आलो नाही, तर युरोपियन राष्ट्राप्रमाणे भारतात परिस्थिती उद्भवू शकते. पुन्हा 'श्रीकृष्ण' येणार नाही, तर प्रत्येकाने 'श्रीकृष्ण' होण्याची वेळ आली आहे असे मार्गदर्शन ज्येष्ठ प्रवचनकार डॉ. संजय उपाध्ये यांनी 'धर्मसंस्थापनार्थाय' या विषयावर व्याख्यान देताना केले. नवरात्र उत्सव व विजयादशमी निमित्त हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानच्या वतीने रविवारी, (दि.२५) हिंदू शौर्य दिन - विराट हिंदू मेळाव्यामध्ये ज्येष्ठ प्रवचनकार डॉ. संजय उपाध्ये यांच्या हस्ते डॉ. अभिजीत सोनवणे यांना 'स्व. प्रा. एकनाथजी नाणेकर स्मृती समाजभूषण पुरस्कार २०२६'; ज्येष्ठ पत्रकार अविनाश चिलेकर यांना 'स्व. संजय आर्य स्मृती पत्रकार भूषण पुरस्कार २०१६' आणि निलंगा येथील श्री राधाकृष्ण फाउंडेशनचे संस्थापक आकाश सोळंके यांना 'कार्य गौरव पुरस्कार २०२६' हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. उत्तम दंडीमे, उपाध्यक्ष राजाभाऊ गोलांडे, सचिव सुहास पोफळे, समन्वयक कैलास बारणे मिलिंद एकबोटे, मंदार देशपांडे, चंद्रकांत नखाते, योगिता बारणे, सुरेश भोईर, सुरेंद्र करमचंदानी, सविता एकनाथ नाणेकर, सुजाता पोफळे, महेश कुलकर्णी, अर्थ सल्लागार अनुजा घाडगे, अतुल जोशी आदी उपस्थित होते. डॉ. उपाध्ये पुढे म्हणाले की, या राष्ट्रासाठी ज्या अल्पसंख्याकांनी आपले कर्तृत्व दाखवले त्यांना देशवासीयांनी डोक्यावर घेतले. ७५ वर्षात ५ शिक्षण मंत्री अल्पसंख्यांक होते. अन्य देशातील अल्पसंख्याकांपेक्षा भारतातील अल्पसंख्यांक सुरक्षित आणि विकासाचे जास्त लाभार्थी आहेत. भारता शेजारील देशात हिंदूंची संख्या कमी होत असताना भारतात मुस्लिमांची संख्या वाढत आहे हे चिंताजनक आहे. आतापर्यंतच्या शिक्षणाने हिंदुत्वाची वाट लावली आहे. अकबरच मोठा झाल्याचे शिक्षण ठरवून दिले. आता राजकारण सोडून सर्वांनी देशहित डोळ्यापुढे ठेवून एकत्र येणे आवश्यक आहे.





विश्वविक्रमी सोहळ्याच्या रील स्पर्धेत मयूर अहेर ठरला 'ब्लॉकब्लास्टर' विजेता!

■ एक लाख रुपये रोख पारितोषिक, स्मृतीचिन्ह अन् भेटवस्तुचा मानकरी

■ महाराष्ट्रातील सर्वात मोठी रील स्पर्धेचा परितोषिक वितरण समारंभ दिमाखात

■ पिंपरी (दै. संध्या)

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे जगातील सर्वांत उंच स्मारक "स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण" आणि निर्माणाधीन भगवा धर्मध्वज यांना ढोल-ताशांच्या ऐतिहासिक विश्वविक्रमी मानवंदना सोहळ्याचे क्षण सर्जनशील रीलच्या माध्यमातून समाजमाध्यमांवर पोहोचविणाऱ्या रील निर्मात्यांच्या हिंदूभूषण स्मारक ट्रस्टतर्फे गौरव करण्यात आला. ट्रस्टतर्फे आयोजित खुल्या रील स्पर्धा-२०२६ मध्ये नाशिक येथील मयूर अहेर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना एक लाख रुपयांची रोख रक्कम, स्मृतीचिन्ह आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.



आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून दि.४ ऑक्टोबर रोजी झालेल्या ऐतिहासिक मानवंदना सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. त्याची नोंद गिनीज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली. त्या सोहळ्यानिमित्त आयोजित 'ब्लॉकब्लास्टर रील' स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आणि स्नेहमेळावा शनिवारी (दि. २४ ऑक्टोबर) मोशी येथील सीझन्स बँक्वेट येथे पार पडला. यावेळी कामगार नेते सचिन लांडगे, उद्योजक कार्तिक लांडगे, हिंदूभूषण स्मारक ट्रस्टचे सदस्य प्रतापराव मोहिते, पृथ्वीराज लांडगे, सुहास ताम्हाणे आदी उपस्थित होते. हिंदूभूषण स्मारक ट्रस्टचे सचिव प्रसाद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रासह अन्य राज्यातील ७५० हून अधिक रील निर्मात्यांनी सहभाग नोंदवला होता. यामुळे हा सोहळा जगभरात पोहाचला. त्यासोबतच महाराष्ट्रभरात शिव-शंभूप्रेमींनी सोशल मीडियावर तुफान प्रतिसाद दिला आहे. पारितोषिक वितरण समारंभाला ६०० हून अधिक स्पर्धत उपस्थित राहीले. त्यामुळे हा सोहळा अत्यंत दिमाखात संपन्न झाला. आमदार लांडगे यांनी सर्व पारितोषिक विजेत्या रिल निर्मात्यांचे अभिनंदन केले.

उद्योजक कार्तिक लांडगे म्हणाले की, " घरातील आई आणि गोठ्यातील गाई माझ्यासाठी समान पूजनीय आहे" या भावनेतून आमदार महेश लांडगे काम करीत आहेत. देव-देश-धर्म आणि संस्कृती जपण्यासाठी प्रखर भूमिका आणि त्याला आयआयएम, सीईओपी, न्यायालय इमारत आणि संविधान भवन उभारणीसाठी त्यांनी यशस्वी पाठपुरावा केला. 'विकासाभिमूख हिंदुत्वा'च्या या कार्यात सर्व रील निर्माते आणि नेटिझन्सची साथ द्यावी.

या स्पर्धेत यश कदम यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. त्यांना ७५ हजार रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. तृतीय क्रमांकाचे मानकरी जय गाडे यांना ५० हजार रुपये, चतुर्थ क्रमांक विजेत्या हिंदवी भोसले यांना २५ हजार रुपये, तर पाचवा क्रमांक मिळविणाऱ्या प्रणव यांना १० हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. पहिल्या पाचही विजेत्यांना रोख रकमेसह स्मृतीचिन्ह आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. या विजेत्यांना एकूण २ लाख ६० हजार रुपयांची रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली. तसेच, सहभागी सर्व रिल निर्मात्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

'रीलस्टार' म्हणजे उद्याचा भारत घडवणारे युवक आहेत. देव-देश-धर्म आणि संस्कृती जपण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे. रील स्पर्धेमुळे शिव-शंभू विचार जगातील कानाकोपऱ्यात आणि नव्या पिढीपर्यंत पोहचणार आहेत. आता वारकरी सांप्रदायामध्ये पवित्र असलेली इंद्रायणी नदी प्रदूषण आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी आम्ही "इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन"चे आयोजन करतो. या उपक्रमातही रील निर्मात्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करतो.

- सचिन लांडगे, कामगार नेते.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जगातील सर्वात उंच शिल्पाला ढोल-ताशा पथकांच्या मानवंदनेचा सोहळा जगभरात पोहोचवण्यासाठी रील निर्मात्यांनी पुढाकार घेतला. वास्तव आणि सत्य दाखवणारे रील स्टार खऱ्या अर्थाने 'रिअल स्टार' आहेत. सशक्त राष्ट्र आणि त्या राष्ट्रातील सशक्त तरुण घडवण्यासाठी, राष्ट्रभक्ती जागृत करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे.

- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

थोडक्यात पण महत्वाचे



चेअरमनपदी दत्तात्रय खोरे, तर व्हा. चेअरमनपदी मोहन गदादे यांची बिनविरोध निवड

■ माजी पदाधिकाऱ्यांनी अन्य संचालकांना संधी मिळावी म्हणून दिला पदाचा राजीनामा

कवठे येमाई : दैनिक संध्या

शिरूरच्या पूर्व भागातील श्री दत्त तादंळी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी दत्तात्रय झुंबरराव खोरे, तर व्हाईस चेअरमनपदी मोहन बबनराव गदादे यांची एकमुखाने बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीमुळे संस्थेच्या संचालक मंडळात नव्या नेतृत्वाला संधी मिळाली आहे.संस्थेच्या माजी चेअरमन अनिता गदादे व माजी व्हाईस चेअरमन अलका बनकर यांनी संस्थेतील अन्य संचालकांनाही पदावर काम करण्याची संधी मिळावी, या उद्देशाने आपल्या पदांचे राजीनामे दिले. त्यांच्या या निर्णयानंतर नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यावेळी संस्थेचे संचालक दत्तात्रय अण्णा गदादे, शंकर भाऊ गदादे, फत्तेसिंग गदादे, मारुती सिताराम गदादे, गोरख काका खोरे, नंदू कुलकर्णी, ज्ञानदेव ढमढेरे, पोपट अण्णा आदींसह संचालक मंडळ उपस्थित होते.तसेच शिरूर पंचायत समितीचे माजी कार्यक्षम सदस्य राजेंद्र गदादे, श्याम अप्पा खोरे, शिवाजी खोरे, संभाजी खोरे, रामदास गदादे, दत्तात्रय नलगे, शंकर अण्णा गदादे, संस्थेचे सचिव शरद बनकर, कर्मचारी राजू बनकर, राजू ननवरे यांच्यासह मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पिसाळ साहेब यांनी काम पाहिले. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित संचालक व सभासदांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

निमोणे येथे हातभट्टीवर पोलिसांचा छापा; कारसह ५.४१ लाखांचा मुद्देमाल जप्त

कवठे येमाई : दैनिक संध्या

शिरूर तालुक्यातील निमोणे येथे घोडनदीच्या किनारी उसाच्या शेतात सुरू असलेल्या गावठी हातभट्टीवर शिरूर पोलिसांनी छापा टाकून टोयोटा ग्लान्झा कारसह एकूण ५ लाख ४१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दि. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी ही कारवाई करण्यात आली. गोपनीय माहितीच्या आधारे सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी भोसले व पथकाने गट क्रमांक ४८९ मधील उसाच्या शेतात छापा टाकला. यावेळी ४०० लिटर गावठी हातभट्टीचे कच्चे रसायन, पाच लिटर गावठी दारू, पाच लिटर केमिकलयुक्त ताडी, हातभट्टीचे साहित्य आणि MH-12-ZG-8184 क्रमांकाची पांढऱ्या रंगाची टोयोटा ग्लांझा कार जप्त करण्यात आली. पोलिसांची चाहूल लागताच आरोपी घटनास्थळावरून पळून गेले. या प्रकरणी लता जंबु चौघुले, प्रियंका राजेंद्र चौघुले, रवि जंबु चौघुले, विकी जंबु चौगुले आणि राजेंद्र रोहीदास चौघुले (सर्व रा. निमोणे) यांच्याविरुद्ध शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक ९७१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १२३ व महाराष्ट्र दारूबंदी कायद्यातील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या अधिपत्याखाली ही कारवाई करण्यात आली. पुढील तपास पोलीस हवालदार टेंगले करीत आहेत.अवैध दारूनिर्मिती व विक्रीविरोधात शिरूर पोलिसांची जोरदार कारवाई सध्या सुरू आहे.

राहुल कुल यांच्या वाढदिवसानिमित्त केडगाव येथे मोफत आरोग्य महाशिबिराचे आयोजन



केडगाव : दैनिक संध्या

दौंड तालुक्याचे आमदार ॲड. राहुल कुल यांच्या वाढदिवसानिमित्त श्री वरदविनायक हॉस्पिटलच्या वतीने केडगाव येथे मोफत आरोग्य महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या महाशिबिराच्या माध्यमातून नागरिकांना विविध वैद्यकीय तपासण्या, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. श्री वरदविनायक हॉस्पिटल, राम सिंधू कॉम्प्लेक्स, शिरूर चौफुला रोड, केडगाव टोलनाका, ता. दौंड, जि. पुणे येथे हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. विविध आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी या महाशिबिरामध्ये मेंदू व स्पाईन, अस्थिरोग, पोटाचे विकार व एंडोस्कोपी, हृदयरोग तसेच फिजिओथेरपी अशा विविध वैद्यकीय सेवांसाठी तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध असणार आहेत. नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. महाशिबिराच्या निमित्ताने २५ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार X-Ray, MRI, CT Scan आणि लॅब तपासण्यांवर ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. तसेच सोनोग्राफी तपासणीवरही ५० टक्के सवलत उपलब्ध असेल.याशिवाय, १ नोव्हेंबर २०२६ रोजी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार 2D Echo तपासणीवर ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे.

देवीचे दागिने चोरणाऱ्या आरोपीस वेळापूर पोलीसांनी शिताफीने पकडले



बाबुर्डी : दैनिक संध्या

कुर्दुवाडी पोलीस ठाणे हददीतील मौजे उजनी ता. माढा येथील पद्मावती देवीच्या मंदीरातील देवीच्या गळयातील ६,४५, २५०/- रूपयाचे सोन्याचांदीचे दागिने चोरीस गेलेबाबत दिनांक २४/०१/२०२६ रोजी कुर्दुवाडी पोलीस ठाणेस गुन्हा दाखल होता. नमूद गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे कासलिंग बापू शिंदे मुळ रा. काटी ता. इंदापूर जि. पुणे हा गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होता. सदर पाहीजे आरोपी हा आज रोजी वेळापूर येथील वीज बोर्डाचे पाठीमागे येणार असल्याचे बातमीदारामार्फत माहीती मिळाल्याने स.पो.नि. आशिष कांबळे व पोलीस स्टाप असे मिळून सदर ठिकाणी गेले असता तेथे एक इसम हा पोलीस आल्याचे पाहताच पळाला त्यावेळी पोलीसांनी त्याचा पाठलाग करून सदर इसमास पकडले. त्यावेळी त्याचेकडे चौकशी केली असता प्रथम त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. खोट्या नावाची बतावणी करीत होता त्यानंतर सदर इसमास पोलीस ठाणे येथे आणून त्याचेकडे सखोल चौकशी केली असता त्याने आपले नाव कासलिंग बापू शिंदे मुळ रा. काटी ता. इंदापूर जि. पुणे असे सांगितले. त्यानंतर कुर्डवाडी पोलीस ठाणे येथे संपर्क करून सदर आरोपीस पुढील कार्यवाही करीता कुडुवाडी पोलीसांचे ताब्यात दिले. सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री. अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती कटटे व मा. उपविभागिय पोलीस अधिकारी अकलुज श्री. संतोष वाळके यांचे मार्गदर्शनाखाली वेळापूर पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी स.पो.नि. आशिष कांबळे, पोना/नितीन लिंगडे, पोशि/तानाजी पांढरे, चापोह/सुहिल पठाण यांनी केले आहे.

अमली पदार्थांच्या विरोधात समाजाने सजग राहून एकत्र लढावे

एनसीबीचे मुंबई विभागीय संचालक अमित घावटे यांचे आवाहन

■ शिरूर (दै. संध्या)

अमली पदार्थांचा विळखा दिवसेंदिवस वाढत असून या गंभीर समस्येविरोधात समाजातल्या प्रत्येक घटकाने सजग राहून ठामपणे उभे राहिले पाहिजे, असे प्रतिपादन अमली पदार्थ नियंत्रण कक्षाचे (एनसीबी) संचालक अमित घावटे यांनी केले. शिरूर येथील सनशाईन सॅटर्डे क्लबच्या वतीने आयोजित 'अमली पदार्थांचा वाढता विळखा' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्लबचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) माजी अध्यक्ष किशोरराजे निंबाळकर होते. या वेळी पंतप्रधान कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी डॉ. अयाज तांबोळी आणि पोलीस उपअधीक्षक अनिल कटके आदी मान्यवर उपस्थित होते. आपल्या व्याख्यानात घावटे म्हणाले, "अमली पदार्थांची समस्या आता केवळ शहरी भागापुरती मर्यादित राहिलेली नसून ग्रामीण भागातही तिचे लोण पसरले आहे. वाढता अंमली पदार्थांचा वापर देशाच्या सुरक्षेपुढे मोठे आव्हान उभे करत आहे. कोरोनाच्या काळानंतर नशेचे प्रमाण अधिक वाढल्याचे दिसून येत आहे. ही बाब लक्षात घेऊन शासनाने अंमली पदार्थांविरोधातील लढा व्यापक केला असून, या समस्येचा २०२९ पर्यंत पूर्णपणे नायनाट करण्याचा संकल्प केला आहे."



तरुणांमधील आणि मुलांमधील वाढत्या व्यसनाधीनतेबद्दल चिंता व्यक्त करत घावटे यांनी पालकांसाठी काही महत्त्वाच्या सूचना मांडल्या. "पालकांनी आपल्या मुलांच्या वर्तनावर आणि दिनचर्येवर काळजीपूर्वक लक्ष ठेवले पाहिजे. मुले सोशल मीडियाचा वापर कसा करतात, कोणाच्या संपर्कात आहेत, ती एकांतात राहतात का, याकडे बारकाईने पाहावे. तसेच घरातील पैसे सुरक्षित आहेत का आणि पाल्याचा अचानक खर्च वाढला आहे का, तो तणावाखाली आहे का, या गोष्टी तपासाव्यात. पाल्यांच्या मित्रांच्या संगतीवरही लक्ष देऊन कोणतीही शंका आल्यास वेळीच योग्य उपाययोजना करावी," असा सल्ला त्यांनी दिला. अमली पदार्थांच्या विळख्यातून सुटका करण्यासाठी अनेक सामाजिक संस्था कार्यरत आहेत. मात्र, या संकटाविरोधातील लढा यशस्वी करण्यासाठी संपूर्ण समाजाने एकत्र येऊन लढा देणे गरजेचे आहे, असे आवाहनही त्यांनी शेवटी केले.

यावेळी पंतप्रधान कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी डॉ. अयाज तांबोळी यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.

पोलीस उपअधीक्षक अनिल कटके यांचा विशेष सन्मान

कार्यक्रमादरम्यान राष्ट्रपती पोलीस पदक प्राप्त पोलीस उपअधीक्षक अनिल कटके यांचा विशेष नागरी सत्कार करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी प्रास्ताविक किशोरराजे निंबाळकर यांनी केले, तर उपस्थितांचा परिचय व स्वागत डॉ. विक्रम घावटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सतीश धुमाळ यांनी केले आणि आभार उदय शिंदे यांनी मानले.

दोडका, गवार, काकडी, कोबी व दुधी भोपळ्याची भरपूर आवक

■ चाकण (दै. संध्या)

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कारली, फरशी, दोडका, गवार, काकडी, कोबी व दुधी भोपळ्याची भरपूर आवक झाली. पालेभाज्या व फळभाज्यांचे भाव गडगडले आहेत. एकूण उलाढाल ५ कोटी ८० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १,००० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत कांद्याची आवक २५० क्विंटलने वाढली. कांद्याला कमाल भाव ४,५०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,६५० क्विंटल झाली. बटाट्याला कमाल भाव १,५०० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक ३० क्विंटल झाली. लसणाला कमाल भाव १७ हजार रुपये मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक २९० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ४ हजार रुपयां पासून ते ६ हजार रुपयांपर्यंत कमाल भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे : कांदा - एकूण आवक - १,००० क्विंटल. भाव क्रमांक - १. ४,५०० रुपये, भाव क्रमांक २. ३,५०० रुपये, भाव



क्रमांक ३. १,८०० रू. बटाटा - एकूण आवक - १,६५० क्विंटल.भाव क्रमांक १. १,५०० रुपये, भाव क्रमांक २.१,१०० रुपये, भाव क्रमांक ३.८०० रुपये.

फळभाज्या : फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - ४३१ क्विंटल (७०० ते १,३०० रू.), कोबी - २१८ क्विंटल (४०० ते ८०० रू.), फ्लॉवर - २८० क्विंटल (७०० ते १,२०० रु.), वांगी - ७६ क्विंटल (४,००० ते ६,००० रु.), भेंडी - ९३ क्विंटल (२,५०० ते ४,००० रु.), दोडका - ७३ क्विंटल (२,००० ते ३,५०० रु.), कारली - ७५ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), दुधीभोपळा - ७० क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - ९५ क्विंटल (१,००० ते ३,००० रु.), फरशी - ३६ क्विंटल (३,००० ते ५,००० रु.), वालवड - ५४ क्विंटल (४,००० ते ६,५०० रुपये), ढोबळी मिरची - १३० क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), चवळी - ५४ क्विंटल (१,५०० ते ३,००० रु.), शेवगा - २५ क्विंटल (५,००० ते ७,००० रु.), गाजर - १६० क्विंटल (१,००० ते २,५०० रु.), गवार - ४६ क्विंटल (४,००० ते ६,००० रु.), आले - १९० क्विंटल (५,००० ते ८,००० रु.), वाटाणा - ३५ क्विंटल (८,००० ते १२,००० रु.), पालेभाज्या : चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे - मेथी - एकूण ४ हजार ७८० जुड्या (१,५०० ते २,५०० रुपये), कोथिंबीर - एकूण २३ हजार ५४० जुड्या (८०० ते १,५०० रुपये,), शेपू - एकूण ३ हजार ५९४ जुड्या (१,००० ते १,५०० रुपये), पालक - एकूण ४ हजार ८५४ जुड्या (५०० ते ८०० रुपये),



भैरवनाथ तरुण मंडळ बाबुर्डी यांच्यावतीने नवरात्रोत्सव उत्साहात संपन्न

■ बाबुर्डी (दै. संध्या)

श्री भैरवनाथ तरुण मंडळ,बाबुर्डी यांच्यावतीने नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कोंढणपूर ते बाबुर्डी मशाल ज्योत यात्रा आणि घटस्थापनेने उत्सवाची सुरुवात झाली.उत्सवादरम्यान दांडिया-गरबा, व्याख्यान, सामाजिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम आणि संगीतबद्ध मंगळागौर यांसारख्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शेखर ओव्होळ प्रस्तुत 'होम मिनिस्टर' या विशेष कार्यक्रमाला महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. सुनील शिंदे व गोरखनाथ खोमणे यांनी या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला कै.अजितदादा पवार,कै. नाना पाटेकर आणि रतन काका यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.त्यानंतर गावातील मान्यवर,आजी-माजीलोकप्रतिनिधी,अधिकारी व बचत गटांच्या महिलांचा सत्कार करण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रमाने या उत्सवाची सांगता झाली.मंडळाचे अध्यक्ष सचिन खोमणे व त्यांच्या संपूर्ण कार्यकारिणीने विविध समित्यांनी आणि ग्रामस्थांनी या उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

नायगावात कोजागिरी पौर्णिमेचा भक्तिमय सोहळा संपन्न

■ पुरंदर (दै. संध्या)

पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील श्रीक्षेत्र नायगाव येथे जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी मंदिरात कोजागिरी पौर्णिमा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. कोजागिरीनिमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांचे दर्शन घेतले. कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने पहाटे पांडेश्वर येथून ग्रामस्थांनी आणलेल्या कऱ्हा नदीच्या पाण्याने श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांना स्नान घालण्यात आले. त्यानंतर ह.भ.प. सचिन महाराज रसाळ (देऊळगाव रसाळ) यांच्या सुश्राव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले.त्यांनी विनामूल्य सेवा दिली. आपल्या रसाळ वाणीतून विविध दृष्टांत, उदाहरणे आणि आध्यात्मिक विचार मांडत त्यांनी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले.कीर्तनास आबा महाराज बोरकर,मोरे महाराज व चांगण महाराज यांनी साथ दिली.मृदुंगाची साथ तेजस खेसे



यांनी केली, तर नायगाव भजनी मंडळाने भजनाची सेवा बजावली.विणेकरी म्हणून ह.भ.प. तुकाराम चौंडकर यांनी सेवा केली. श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची आकर्षक महापूजा पुजारी सचिन जगताप यांनी केली.मंदिर परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते.कोजागिरी पौर्णिमेनिमित्त भाविकांसाठी अन्नदानाचेही आयोजन करण्यात आले.मधुकर दोरगे (यवत), संदीप पवार (फुरसुंगी), देविदास होले (उंड्री), पांडुरंग महानवर (एकेरीवाडी), राजेंद्र होले, सुनीता होले (सासवड), सविता गद्रे (माळशिरस), तुषार शेंडगे (हडपसर), बाळासो खेसे,राकेश कड, सुवर्णा जगताप (नायगाव) व अंकुश शेंडगे (चौफुला) यांच्या वतीने भाविकांना अन्नदान करण्यात आले.

संभाव्य पाणी टंचाईचा आढावा घेऊन उपाय योजना कराव्यात

■ राजगुरूनगर (दै. संध्या)

एल-निनोच्या संभाव्य प्रभावामुळे आगामी काळात पर्जन्यमान अनिश्चित राहण्याची आणि राज्यातील अनेक भागांत पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच प्रतिबंधात्मक उपाययोजनांना सुरुवात करावी. संभाव्य जलसंकटाचा सामना करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याचा स्वतंत्र कृती आराखडा तयार करून त्याची कालबद्ध अंमलबजावणी करावी, अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे पुणे जिल्हाध्यक्ष ॲड. तुषार झेंडे पाटील यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री आणि राज्याच्या मुख्य सचिवांकडे निवेदन सादर केले आहे. जिल्हा पालक सचिवांनी मंत्रालयातील बैठका आणि कागदोपत्री आढाव्यापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष जिल्हा दौरे करून पाणीटंचाईच्या संभाव्य परिस्थितीची पाहणी करावी, असे साकडेही त्यांनी शासनाला घातले आहे.

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, शहरी भागातील पाणीपुरवठा, शेतीसाठी उपलब्ध पाणी आणि पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याची गरज या बाबींचा एकत्रित विचार करून शासनाने प्रतिबंधात्मक धोरण आखावे, अशी भूमिका झेंडे पाटील यांनी निवेदनातून मांडली आहे.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीची मागणी

मंत्रालयातील बैठका नकोत, प्रत्यक्ष पाहणी हवी

जिल्हा पालक सचिवांनी आपल्या कार्यक्षेत्रातील पाणीपुरवठ्याच्या परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घ्यावा, यावर झेंडेपाटील यांनी विशेष भर दिला आहे. राज्य शासनाच्या ५ ऑगस्ट २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्हा पालक सचिवांच्या कर्तव्यांचा संदर्भ देत त्यांनी प्रत्येक जिल्ह्यात प्रत्यक्ष पाहणी दौरे आयोजित करण्याची मागणी केली आहे. जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच जलसंपदा, पाणीपुरवठा, भूजल, महसूल, कृषी आणि आरोग्य विभागांच्या अधिकाऱ्यांना एकत्र घेऊन जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईचा सविस्तर आढावा घेण्यात यावा, असे त्यांनी सुचविले आहे.

धरणांपासून गाव-वस्त्यांपर्यंत परिस्थिती तपासा

प्रस्तावित कृती आराखड्यात धरणे, तलाव, लघु जलसाठे, भूजलपातळी आणि ग्रामीण व शहरी पाणीपुरवठा योजनांची सद्यःस्थिती नोंदविण्यात यावी. संभाव्य टंचाईग्रस्त गावे, वाड्या-वस्त्या आणि पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने संवेदनशील भागांची आधीच ओळख पटवावी. संबंधित भागांत उपलब्ध असलेला पाणीसाठा किती काळ पुरू शकतो, पर्यायी स्रोत कोणते उपलब्ध आहेत आणि टंचाई निर्माण झाल्यास कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील, याचे नियोजन करणे गरजेचे आहे. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देताना पाणीगळती, पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात. आवश्यकतेनुसार पर्यायी पाणीपुरवठा स्रोत निश्चित करणे, टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवणे आणि उपलब्ध पाण्याची गुणवत्ता नियमित तपासणे यांचाही कृती आराखड्यात समावेश असावा.

पशुधन वाचविण्यासाठी चारा अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करा

आपचे पुणे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय कड यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी; अन्यथा आंदोलनाचा इशारा

चारा छावण्या आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करा

■ पुरंदर (दै. संध्या)

महाराष्ट्रातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांसमोर पशुधनाच्या संगोपनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर शासनाकडून देण्यात येणाऱ्या चारा अनुदानाची रक्कम कोणत्याही मध्यस्थामार्फत न देता पात्र शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यावर जमा करावी, अशी मागणी आम आदमी पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय कड यांनी पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने अनेक भागांत चाऱ्याची टंचाई जाणवत आहे. त्यामुळे जनावरांचे संगोपन करताना शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांचे आर्थिक गणित दूध व्यवसाय आणि पशुपालनावर अवलंबून असते. अशा परिस्थितीत चाऱ्याअभावी पशुधनाचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसू शकतो. त्यामुळे शासनाने तातडीने मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

"पशुधन वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळणे अत्यंत गरजेचे आहे. मदत मिळण्यास विलंब झाल्यास शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते," असे निवेदनात म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन चारा अनुदानाबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी दत्तात्रय कड यांनी केली आहे. प्रशासनाकडून वेळेत कार्यवाही न झाल्यास आगामी काळात आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

चारा अनुदानाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करावी. जनावरांचे टॅगिंग झालेले असल्याने उपलब्ध नोंदींच्या आधारे पशुधनाची पडताळणी करून पात्र शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ द्यावा, असे निवेदनात म्हटले आहे.

याशिवाय, अनुदानासाठी पात्र शेतकऱ्यांची यादी, मंजूर झालेली रक्कम आणि प्रत्यक्ष वितरणाची सद्यस्थिती सार्वजनिक करावी. कोणताही पात्र शेतकरी अनुदानापासून वंचित राहणार नाही, याची प्रशासनाने दक्षता घ्यावी. अनुदान वाटपाची प्रक्रिया पूर्ण करताना विलंब होणार नाही, यासाठी संबंधित विभागांना आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे. दुष्काळसदृश परिस्थितीचा विचार करून गावोगावी गरजेनुसार चारा छावण्या सुरू कराव्यात. चारा डेपो उपलब्ध करून देण्याबरोबरच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. शेतकऱ्यांना वेळेत आर्थिक मदत मिळाल्यास पशुधनाचे संगोपन करणे सुलभ होईल, असे कड यांनी निवेदनात नमूद केले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा बारामती दौरा तूर्तास स्थगित

बारामती : दैनिक संध्या

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा बारामती मधील नोव्हेंबर महिन्यातील पुर्व नियोजत दौरा तूर्त स्थगित करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.दौऱ्याची निश्चित तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार आहे,अशी माहिती विद्या प्रतिष्ठानच्या सूत्रांकडून देण्यात आलेली आहे. बारामती येथील विद्या प्रतिष्ठान मध्ये उभारण्यात आलेल्या 'प्रेरणास्थळ' या इमारतीचे उदघाटन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार होते.तशी माहिती पंतप्रधान कार्यालयाकडून देण्यात आलेली पण होती. त्यानुसार बारामती मध्ये दौऱ्याची तयारी जोरदार चालू असताना काल अचानक हा नियोजित दौरा तूर्तास स्थगित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. अगदी विश्वासू सूत्रांनी दिलेल्या माहिती नुसार काही कारणास्तव हा पुर्व नियोजित दौरा तूर्तास तरी स्थगित करण्यात आलेला आहे.देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तीन नोव्हेंबरला बारामतीच्या दौऱ्यावर येणार नाहीत अशी खात्रीदायक माहिती आहे. यदा कदाचित पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दौरा हा नोव्हेंबर महिन्याच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवड्यात होऊ शकतो.मात्र या बाबतची तारीख आणि माहिती सुद्धा अद्यापपर्यंत तरी अधिकृतरित्या मिळालेली नाही.

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी साहित्य साधने मोजमाप शिबिर संपन्न

चाकण : दैनिक संध्या

पुणे जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती खेड, शिक्षण विभाग समावेशित शिक्षण, अलिम्को मुंबई, फियाट इंडिया ऑटोमोबाईल्स कंपनीत रांजणगाव शिरूर यांच्या संयुक्त विद्यमाने खेड विकास गटातील दिव्यांग विद्यार्थ्यांना साहित्य देण्याकरिता मोजमाप शिबिर चाकण येथे घेण्यात आले. सदर शिबिरात अस्थिव्यंग, बहुविकलांग, सेरेब्रल पाल्सी, कर्णदोष, बौद्धिक अक्षमता प्रवर्गातील ७७ दिव्यांग विद्यार्थ्यांची त्यांच्या गरजेनुसार तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून ६६ विद्यार्थ्यांना व्हीलचेअर, कॅलिपर, सीपी चेअर, वॉकर, श्रवण यंत्र, टीएलएम किट इत्यादी साहित्य साधनांसाठी संदर्भित करण्यात आले. खेड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले यांच्या मार्गदर्शनाखाली सदर शिबिर घेण्यात आले. सदर तपासणी शिबिरास फियाट इंडिया ऑटोमोबाईल प्रायव्हेट लिमिटेड रांजणगाव कंपनीचे सीएसआर व्यवस्थापक अमोल फटाले व फियाट सक्षमच्या वतीने अलिम्को संस्थेचे डॉ. संकेत देवाणकर, डॉ. तेहेनशा मेहता, हर्ष विश्व कर्मा यांचे सहकार्य मिळाले. तसेच सावलेस कंपनीचे आकाश सूर्यवंशी व त्यांचे टीम यांनी २४ - २५ मध्ये ज्या दिव्यांग विद्यार्थ्यांना साहित्य देण्यात आले होते, त्यांचा साहित्य वापराबाबत फीडबॅक तसेच विशेष शिक्षकांचा फीडबॅक नोंदवून घेतला.

बारामतीतील वनपाल एसीबीच्या जाळ्यात!

शेतकऱ्याच्या कामात अडथळा आणून १० हजारांच्या लाचेची मागणी; माळेगावातील हॉटेलमध्ये सापळा लावत मोठी कारवाई

■ आधी ४ हजार स्वीकारले,उर्वरित ६ हजार घेताना वनपाल एसीबीच्या जाळ्यात

■ बारामती (दै. संध्या)

बारामती तालुक्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई केली असून,वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय बारामती अंतर्गत कार्यरत वनपाल तथा करंजे राऊंड ऑफिसर जहीर सिराज शेख (वय ४७ वर्षे) यांना ६ हजार रुपयांची लाच स्वीकारल्याप्रकरणी ताब्यात घेण्यात आले आहे.रविवार, दिनांक २५ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजून १७ मिनिटांनी ही कारवाई करण्यात आली.या घटनेमुळे वनविभागातील लाचखोरीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. तक्रारदार हे ६० वर्षीय पुरुष असून,त्यांची कोहाळे खुर्द येथे चार हेक्टर शेतजमीन आहे.संबंधित शेतातील माती पावसामुळे नीरा नदीत वाहून गेली होती.त्यामुळे नदीपात्रातील माती शेतात टाकण्याचे काम सुरू असताना, आरोपी लोकसेवक जहीर शेख यांनी २६ सप्टेंबर २०२६ रोजी तक्रारदाराचे काम बंद करून सदर जागा फॉरेस्टच्या मालकीची असल्याचे सांगितले.तसेच तक्रारदार यांच्यावर कारवाई करण्याची भीती दाखवल्याचा आरोप आहे. त्यानंतर तक्रारदाराने काम सुरू ठेवण्यासाठी विनंती केली असता, आरोपीने कारवाई न करता काम सुरू ठेवण्यासाठी तक्रारदाराच्या सहकारी भामरे मंडळाकडून १० हजार रुपयांची लाच मागितल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यापैकी ४ हजार रुपये स्वीकारल्यानंतर उर्वरित ६ हजार रुपये दिल्याशिवाय काम सुरू करू नये,अशी मागणी केल्याचा आरोप आहे. तक्रारदाराने १४ ऑक्टोबर २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. त्यानंतर २३ ऑक्टोबर रोजी लाच मागणीची पडताळणी करण्यात आली.या पडताळणीदरम्यान आरोपी लोकसेवक जहीर शेख, वनपाल यांनी तक्रारदाराकडे पंचांसमक्ष १० हजार रुपयांच्या लाचेबाबत बोलणी करून,यापूर्वी ४ हजार रुपये स्वीकारल्याचे मान्य करत उर्वरित ६ हजार रुपये स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे. या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम ७ अन्वये माळेगाव पोलिस स्टेशन,पुणे ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की,कोणत्याही लोकसेवकाने शासकीय कामासाठी लाचेची मागणी केल्यास विभागाशी संपर्क साधावा. तक्रारीसाठी विभागाच्या अधिकृत संपर्क क्रमांकांचा वापर करता येईल.



हॉटेल शिवकृपा येथे सापळा

लाच मागणीच्या अनुषंगाने रविवार, २५ ऑक्टोबर २०२६ रोजी सापळा कारवाई करण्यात आली.या कारवाईदरम्यान आरोपी जहीर सिराज शेख यांनी तक्रारदाराकडून उर्वरित ६ हजार रुपये स्वीकारल्याचे नमूद आहे. माळेगाव परिसरातील हॉटेल शिवकृपा,आयटीआय, माळेगावसमोर,बारामती येथे ही कारवाई करण्यात आली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आरोपीला दुपारी २:१७ वाजता ताब्यात घेतले.लाचेची रक्कम पंचांसमक्ष स्वीकारल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे.

कारवाईतील अधिकारी व पथक

- सापळा अधिकारी: श्री.संतोष पाटील,पोलिस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.संपर्क: ८८०६३२१८१७
- पर्यवेक्षण अधिकारी: श्री.सतीश वाळके,पोलिस उपअधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे.संपर्क: ८०८७००२०२०
- सापळा पथक: पो.कॉ. /१९६६ प्रवीण तावरे,मपोशि/७९३४ वैशाली माकर आणि श्रेणी पो.उपनिरीक्षक अविनाश चव्हाण.
- मार्गदर्शन: श्री.शिरीष सरदेशपांडे,पोलिस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे आणि श्री.अजित पाटील,अपर पोलिस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे.

OPPO च्या F-सीरीजला भारतात १० वर्षे पूर्ण; F35 सिरीजसह 'ग्रुप सेल्फी एक्सपर्ट'चा नवा अनुभव!

■ पुणे (दै. संध्या)

स्मार्टफोन छायाचित्रणाच्या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या OPPO कंपनीने भारतातील F-सीरीजच्या प्रवासाला दहा वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त नवीन OPPO F35 सिरीज सादर केली आहे. या सिरीजमध्ये OPPO F35 Pro 5G आणि OPPO F35 5G या दोन स्मार्टफोनचा समावेश आहे. वैयक्तिक सेल्फीपासून ते कुटुंबीय, मित्रपरिवार आणि मोठ्या समूहासोबतचे क्षण एकाच छायाचित्रात टिपण्यापर्यंतचा प्रवास अधोरेखित करत कंपनीने या सिरीजसाठी 'ग्रुप सेल्फी एक्सपर्ट' ही संकल्पना मांडली आहे.



■ ५० मेगापिक्सेल अल्ट्रा-वाइड सेल्फी कॅमेरा, ८००० एमएएचची बॅटरी आणि ८० वॅट फास्ट चार्जिंगसह OPPO F35 Pro 5G आणि F35 5G सादर

नवीन सिरीजमध्ये ५० मेगापिक्सेलचा अल्ट्रा-वाइड नॅचरल सेल्फी कॅमेरा, १०० अंशांचा दृश्यकोन, मोठी बॅटरी, जलद चार्जिंग, उच्च क्षमतेचे प्रदर्शन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित विविध सुविधा देण्यात आल्या आहेत. छायाचित्रण, व्हिडिओ निर्मिती, मनोरंजन आणि दैनंदिन वापरासाठी स्मार्टफोन शोधणाऱ्या ग्राहकांना लक्षात घेऊन ही सिरीज विकसित करण्यात आल्याचे कंपनीने सांगितले. OPPO ने दहा वर्षांपूर्वी F1 मॉडेलच्या माध्यमातून 'सेल्फी एक्सपर्ट' ही ओळख ग्राहकांसमोर आणली होती. त्यानंतर स्मार्टफोन छायाचित्रणातील बदलत्या गरजा, डिजिटल माध्यमांचा वाढता वापर आणि ग्राहकांच्या अपेक्षा लक्षात घेऊन F-सीरीजमध्ये सातत्याने बदल करण्यात आले. कंपनीच्या माहितीनुसार, गेल्या दहा वर्षांत भारतात F-सीरीजच्या तीन कोटींहून अधिक स्मार्टफोनची विक्री झाली आहे. सुरुवातीला वैयक्तिक छायाचित्रणावर भर देणारी ही सिरीज आता समूह छायाचित्रण, व्हिडिओ निर्मिती, सर्जनशीलता आणि दैनंदिन वापराच्या सुविधांवर लक्ष केंद्रित करत आहे. आजच्या डिजिटल युगात स्मार्टफोनचा वापर केवळ छायाचित्रे काढण्यासाठी होत नाही, तर आठवणी जतन करणे, मित्रपरिवाराशी संपर्क ठेवणे, सामाजिक माध्यमांसाठी चित्रफिती तयार करणे आणि विविध अनुभव शेअर करण्यासाठीही होतो. याच बदलत्या वापराचा विचार करून F35 सिरीजमध्ये अधिक लोकांना एकाच छायाचित्रात सामावून घेणाऱ्या कॅमेऱ्यावर विशेष भर देण्यात आला आहे. नवीन F35 सिरीजचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ५० मेगापिक्सेलचा अल्ट्रा-वाइड नॅचरल सेल्फी कॅमेरा. या कॅमेऱ्याचा दृश्यकोन १०० अंशांचा असल्याने समूह छायाचित्रे घेताना अधिक लोक आणि सभोवतालचा अधिक भाग एका चौकटीत सामावून घेता येतो.

बौद्ध धम्मातील आश्विन पौर्णिमेचे महत्त्व

(दै. संध्या) : भारतीय संस्कृतीत पौर्णिमेला धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. आश्विन महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेला शरद पौर्णिमा किंवा कोजागरी पौर्णिमा असेही म्हटले जाते. विविध भारतीय परंपरांमध्ये या दिवसाचे महत्त्व वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्त होते. बौद्ध धम्माच्या संदर्भात आश्विन पौर्णिमेचा विचार करताना केवळ चंद्रदर्शन किंवा पारंपरिक विधी यांपुरते मर्यादित न राहता वर्षावासाची सांगता, भिक्खुसंघातील आत्मपरीक्षण, शीलपालन, दान, मैत्री, करुणा आणि प्रज्ञा या मूल्यांचा विचार करणे आवश्यक आहे. बौद्ध धम्माच्या विविध शाखांमध्ये या दिवसाचे आचरण एकसारखे नसले, तरी वर्षावासाच्या समाप्तीशी संबंधित काळ आणि त्यातून मिळणारा आत्मपरीक्षणाचा संदेश महत्त्वपूर्ण ठरतो. आश्विन पौर्णिमेच्या निमित्ताने बुद्धांच्या शिकवणुकीचा वर्तमान भारतीय समाजाशी संबंध जोडणे, हे या दिवसाचे महत्त्व अधिक व्यापक करणारे ठरते.

तथागत गौतम बुद्धांनी मानवी दुःखाचे स्वरूप समजून घेऊन त्यातून मुक्त होण्याचा मार्ग सांगितला. त्यांच्या शिकवणुकीत अंधश्रद्धा, कर्मकांड किंवा बाह्य प्रदर्शनापेक्षा विवेक, नैतिकता, अनुभव आणि प्रज्ञेला महत्त्व आहे. त्यामुळे कोणत्याही धार्मिक तिथीचे महत्त्व तिच्याशी संबंधित परंपरांबरोबरच त्या निमित्ताने व्यक्ती आणि समाजाने स्वीकारावयाच्या मूल्यांमध्येही सामावलेले असते. आश्विन पौर्णिमेच्या निमित्ताने स्वतःच्या विचारांचे, वर्तनाचे आणि सामाजिक जबाबदाऱ्यांचे परीक्षण करणे, मनातील द्वेष व मत्सर कमी करणे, इतरांविषयी करुणा बाळगणे आणि समतेच्या मूल्यांना आपल्या जीवनात स्थान देणे, हा बौद्ध धम्माच्या मूलभूत शिकवणुकीशी सुसंगत दृष्टिकोन आहे.

बौद्ध भिक्खुसंघाच्या जीवनात वर्षावासाला विशेष महत्त्व आहे. पावसाळ्याच्या काळात प्रवास करताना पूर, चिखल आणि इतर नैसर्गिक अडचणी निर्माण होत असत. तसेच या काळात जमिनीवर वाढणाऱ्या वनस्पती आणि निर्माण होणाऱ्या सूक्ष्मजीवांना अनावश्यक इजा होण्याची शक्यता असे. या पार्श्वभूमीवर भिक्खूंनी पावसाळ्यात ठरावीक काळ एका ठिकाणी राहून साधना करण्याची परंपरा विकसित झाली. वर्षावासाच्या काळात भिक्खू धम्माचा अभ्यास करतात, ध्यानसाधना करतात, विनयाचे पालन करतात आणि उपासक-उपासिकांना धम्माचे मार्गदर्शन करतात. गृहस्थ अनुयायीदेखील भिक्खुसंघाच्या सहवासातून शील, दान, संयम आणि प्रज्ञा यांचे महत्त्व समजून घेतात. त्यामुळे वर्षावास हा केवळ एका ठिकाणी राहण्याचा कालावधी नसून वैयक्तिक साधना, सामूहिक शिस्त आणि समाजाशी असलेले नाते दृढ करण्याची संधी आहे.

वर्षावासाच्या समाप्तीशी संबंधित बौद्ध परंपरेत 'पवारणा' या विधीला महत्त्वाचे स्थान आहे. पवारणा म्हणजे भिक्खूंनी आपल्या सहकारी भिक्खूंना वर्तनातील संभाव्य त्रुटी दाखवून देण्याचे आमंत्रण देणे. या प्रक्रियेमागे कोणाचा अपमान करणे किंवा दोषारोप करणे हा हेतू नसतो. उलट, आपल्या आचरणातील उणिवा समजून घेऊन त्या सुधारण्याची तयारी आणि संघजीवनात पारदर्शकता राखणे हा त्यामागील मुख्य उद्देश असतो. व्यक्तीला स्वतःच्या सर्व चुका नेहमीच जाणवतील असे नाही. त्यामुळे विश्वासाच्या वातावरणात इतरांनी दाखवून दिलेल्या त्रुटी शांतपणे ऐकणे, त्यांचा विचार करणे आणि आवश्यक सुधारणा करणे ही धम्माचरणातील महत्त्वाची प्रक्रिया आहे. पवारणेचा हा संदेश आजच्या वैयक्तिक, कौटुंबिक, शैक्षणिक आणि सार्वजनिक जीवनातही मार्गदर्शक ठरू शकतो.

बौद्ध धम्मात शील, समाधी आणि प्रज्ञा ही साधनेची महत्त्वाची अंगे मानली जातात. शील म्हणजे केवळ काही नियमांचे पालन नव्हे, तर आपल्या वर्तनामुळे इतरांना होणाऱ्या परिणामांची जाणीव ठेवून जबाबदारीने जगणे होय. पंचशीलाच्या शिकवणुकीत प्राणिहिंसा टाळणे, चोरी न करणे, कामविषयक गैरवर्तनापासून दूर राहणे, असत्य भाषण न करणे आणि मादक पदार्थांमुळे विवेक हरपेल असे वर्तन टाळणे यांसारख्या नैतिक तत्त्वांचा समावेश होतो. ही तत्त्वे व्यक्तीच्या जीवनात विश्वास, संयम आणि सुरक्षितता निर्माण करण्यास मदत करतात. आश्विन पौर्णिमेच्या निमित्ताने या तत्त्वांकडे केवळ धार्मिक उपदेश म्हणून न पाहता दैनंदिन जीवनातील आचारसंहिता म्हणून पाहिले पाहिजे.

आजच्या काळात असत्य माहिती पसरविणे, दुसऱ्यांची बदनामी करणे, सामाजिक माध्यमांवर अपमानास्पद भाषा वापरणे, आर्थिक व्यवहारांत फसवणूक करणे आणि वैयक्तिक स्वार्थासाठी इतरांच्या हक्कांकडे दुर्लक्ष करणे अशा समस्या दिसून येतात. अशा परिस्थितीत सम्यक वाणी आणि सम्यक कर्म यांचे महत्त्व अधिक वाढते. एखादी माहिती पुढे पाठविण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे, मतभेद असले तरी व्यक्तीचा सन्मान राखणे, दुर्बल व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि सार्वजनिक संपत्तीचा प्रामाणिकपणे वापर करणे ही आधुनिक जीवनातील धम्माचरणाची उदाहरणे आहेत. आश्विन पौर्णिमेच्या निमित्ताने प्रत्येकाने स्वतःला प्रश्न विचारावा की, माझ्या वर्तनामुळे इतरांच्या जीवनात विश्वास वाढतो की भीती निर्माण होते? माझ्या शब्दांतून मैत्री निर्माण होते की द्वेष? माझ्या निर्णयांमुळे समाजात न्याय वाढतो की विषमता दृढ होते?

आत्मपरीक्षणाचा अर्थ स्वतःला दोष देत राहणे असा नाही. त्याचा खरा उद्देश स्वतःच्या चुका ओळखून त्यांत सुधारणा करण्याची तयारी निर्माण करणे हा आहे. चूक झाली हे मान्य करणे, तिच्यामागील कारण समजून घेणे आणि ती पुन्हा होऊ नये यासाठी प्रयत्न करणे हा प्रगल्भतेचा मार्ग आहे. स्वतःला नेहमीच योग्य समजणाऱ्या व्यक्तीला शिकण्याची संधी कमी मिळते; परंतु आपल्या विचारांत सुधारणा करण्याची तयारी असणारी व्यक्ती अधिक संवेदनशील आणि विवेकी बनते. पवारणेच्या भावनेतून मिळणारा हा संदेश केवळ भिक्खुसंघापुरता मर्यादित नाही. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकणे, लोकप्रतिनिधींनी जनतेसमोर उत्तरदायी राहणे, प्रशासकीय यंत्रणेने चुका मान्य करून दुरुस्ती करणे आणि कुटुंबातील सदस्यांनी परस्परांशी मोकळेपणाने संवाद साधणे या सर्व क्षेत्रांत आत्मपरीक्षणाची आवश्यकता आहे.

बौद्ध परंपरेत दानाला महत्त्व आहे; मात्र दानाचा अर्थ केवळ पैसा किंवा वस्तू देणे एवढाच नाही. गरजू व्यक्तीला अन्न, वस्त्र, औषधे किंवा शिक्षणासाठी मदत करणे हे दानाचे प्रत्यक्ष स्वरूप आहे. त्याचबरोबर ज्ञान वाटणे, दुःखी व्यक्तीचे म्हणणे संयमाने ऐकणे, संकटात असलेल्या व्यक्तीला आधार देणे आणि अन्यायग्रस्त व्यक्तीच्या बाजूने उभे राहणे हीदेखील दानशीलतेची रूपे आहेत. दानामागे प्रसिद्धी, प्रतिष्ठा किंवा परतफेडीची अपेक्षा नसावी; त्यामागे करुणा आणि इतरांच्या दुःखाबद्दलची जाणीव असावी. अशा भावनेतून केलेले दान समाजात परस्पर विश्वास वाढविते आणि एकाकीपणाचा सामना करणाऱ्या व्यक्तींना आधार देते. वर्षावासाच्या काळात गृहस्थ उपासक आणि भिक्खुसंघ यांच्यातील परस्परसंबंध दृढ होतात. गृहस्थ अन्नदान आणि आवश्यक वस्तूंच्या माध्यमातून संघाला सहकार्य करतात, तर भिक्खू धम्मोपदेश आणि नैतिक मार्गदर्शनाच्या माध्यमातून समाजाला प्रेरणा देतात. या नात्याचा पाया परस्पर आदर आणि सामाजिक सहकार्य हा आहे. वर्षावासानंतर काही बौद्ध परंपरांमध्ये 'कठिन चीवरदान' या परंपरेला महत्त्व असते. या प्रसंगी भिक्खूंना चीवर किंवा वस्त्र अर्पण केले जाते. पवारणा आणि कठिन चीवरदान या परस्पर संबंधित असल्या, तरी त्या एकच विधी नाहीत. पवारणा ही वर्षावासाच्या समाप्तीशी संबंधित संघातील आत्मपरीक्षणाची प्रक्रिया आहे, तर कठिन चीवरदान ही वर्षावास पूर्ण केलेल्या भिक्खुसंघाला चीवर अर्पण करण्याची स्वतंत्र परंपरा आहे. या परंपरांकडे पाहताना दानाचे सामाजिक आणि नैतिक मूल्य समजून घेणे आवश्यक आहे.

दान हे अन्यायकारक व्यवस्था कायम ठेवण्याचे साधन ठरू नये. गरिबी, भेदभाव आणि वंचितता यांची कारणे दूर करण्यासाठी शिक्षण, रोजगार, आरोग्यसेवा आणि समान संधी उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. करुणा ही केवळ सहानुभूतीची भावना नसून दुःख कमी करण्यासाठी कृती करण्याची प्रेरणा आहे. एखाद्या विद्यार्थ्याला पुस्तके देणे हे दान आहे; परंतु त्याला दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न करणे ही सामाजिक जबाबदारी आहे. एखाद्या गरजू कुटुंबाला अन्न देणे आवश्यक आहे; त्याचबरोबर त्या कुटुंबाला रोजगार आणि सन्मानाने जगण्याच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी काम करणेही गरजेचे आहे. अशा प्रकारे वैयक्तिक दानशीलता आणि सामाजिक न्यायाची जाणीव एकमेकांना पूरक ठरतात.

तथागत बुद्धांनी शिकविलेल्या मैत्रीभावाचा अर्थ सर्व सजीवांविषयी सद्भावना बाळगणे असा आहे. करुणा म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव करून ते कमी करण्याची इच्छा; मुदिता म्हणजे दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानणे; आणि उपेक्षा म्हणजे जीवनातील चढ-उतारांत विवेक व मानसिक संतुलन राखणे. या चार ब्रह्मविहारांचा स्वीकार केल्यास व्यक्तीचे भावविश्व अधिक व्यापक बनते. मतभेद असले तरी द्वेष न बाळगणे, दुसऱ्याच्या यशामुळे मत्सर न करणे, दुःखी व्यक्तीची थट्टा न करता तिला आधार देणे आणि कठीण परिस्थितीतही समतोल राखणे ही या मूल्यांची व्यवहारातील रूपे आहेत. आश्विन पौर्णिमेच्या निमित्ताने अशा सद्गुणांचा अभ्यास आणि आचरण करण्याचा संकल्प करता येतो.

बौद्ध धम्मातील प्रज्ञा म्हणजे केवळ माहितीचे संकलन नव्हे. गोष्टींचे स्वरूप समजून घेणे, कारणपरिणामांचा विचार करणे, पूर्वग्रह ओळखणे आणि विवेकाच्या आधारे निर्णय घेणे ही प्रज्ञेची लक्षणे आहेत. अंधश्रद्धा, अफवा, जातीय द्वेष आणि व्यक्तिपूजेच्या प्रभावाखाली न जाता सत्याचा शोध घेणे हे प्रज्ञेचे सामाजिक महत्त्व आहे. बुद्धांनी व्यक्तीला स्वतः विचार करण्याची आणि अनुभवाच्या कसोटीवर गोष्टी तपासण्याची प्रेरणा दिली. त्यामुळे धम्माचा स्वीकार म्हणजे प्रश्न विचारणे थांबविणे नव्हे; तर अधिक सखोल प्रश्न विचारून सत्य, न्याय आणि कल्याणाच्या दिशेने वाटचाल करणे होय.

भारतीय समाजाच्या संदर्भात समतेचा विचार विशेष महत्त्वाचा आहे. जात, लिंग, भाषा, धर्म, आर्थिक स्थिती किंवा जन्माच्या आधारावर माणसाचे मूल्य ठरविणारी मानसिकता मानवी प्रतिष्ठेला बाधा आणते. बौद्ध धम्मातील करुणा आणि समतेची मूल्ये प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार असल्याची जाणीव दृढ करतात. समाजातील वंचित घटकांना शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि निर्णयप्रक्रियेत समान संधी मिळणे ही सामाजिक न्यायाची मूलभूत गरज आहे. धम्माचरणाचा अर्थ केवळ वैयक्तिक शांतता मिळविणे नसून इतरांच्या दुःखाकडे संवेदनशीलतेने पाहणे आणि अन्याय कमी करण्यासाठी प्रयत्नशील राहणे असाही आहे. भारतात बौद्ध धम्माची परंपरा प्राचीन काळापासून विकसित झाली आहे. तथागत बुद्धांच्या शिकवणुकीने नैतिकता, अहिंसा, करुणा आणि विवेक यांना महत्त्व दिले. पुढील काळात अनेक भिक्खू, अभ्यासक आणि समाजसुधारकांनी या परंपरेचे जतन व प्रसार केला. आधुनिक भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माचा स्वीकार करून त्यातील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेच्या मूल्यांना सामाजिक परिवर्तनाशी जोडले. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर त्यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि मोठ्या संख्येने अनुयायांनी त्यांच्यासोबत धम्माचा स्वीकार केला. हा ऐतिहासिक प्रसंग भारतीय समाजातील जातीय विषमता आणि अपमानकारक सामाजिक व्यवस्थेविरुद्धच्या संघर्षाच्या संदर्भात महत्त्वाचा ठरतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मदृष्टीत नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी यांना मध्यवर्ती स्थान होते. माणसाला माणूस म्हणून सन्मान मिळावा, शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, स्त्री-पुरुष समानता दृढ व्हावी आणि समाजातील भेदभाव कमी व्हावा, या उद्दिष्टांशी धम्मातील मूल्यांचा संबंध जोडता येतो. त्यामुळे आश्विन पौर्णिमेच्या निमित्ताने बौद्ध समाजाने केवळ धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यापलीकडे जाऊन वाचनालये, अभ्यासवर्ग, आरोग्यशिबिरे, रक्तदान, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत आणि वंचित घटकांसाठी मार्गदर्शन यांसारखे उपक्रम राबविण्याचा विचार करावा. अशा उपक्रमांतून करुणा आणि समता ही तत्त्वे प्रत्यक्ष कृतीत उतरू शकतात.

आजच्या वेगवान जीवनात मानसिक ताण, बेरोजगारी, कौटुंबिक संघर्ष, सामाजिक माध्यमांवरील आक्रमकता आणि वाढती असहिष्णुता यांमुळे व्यक्ती व समाजासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. अशा परिस्थितीत ध्यान, सजगता, संयमित वाणी आणि विवेकपूर्ण निर्णय यांचे महत्त्व वाढते. तथापि, धम्माचा उपयोग केवळ वैयक्तिक ताण कमी करण्यापुरता मर्यादित ठेवणे योग्य नाही. व्यक्तीच्या अंतर्मनातील शांतता आणि समाजातील न्याय यांचा परस्परसंबंध ओळखणे आवश्यक आहे. ध्यान करणारी व्यक्ती जर इतरांच्या दुःखाबद्दल उदासीन राहिली, तर धम्मातील करुणेचा आशय अपूर्ण राहतो. त्याचप्रमाणे सामाजिक परिवर्तनासाठी काम करणाऱ्या व्यक्तीने स्वतःच्या वर्तनात संयम, सत्यनिष्ठा आणि समतेची मूल्ये जोपासणेही गरजेचे आहे. युवकांसाठी आश्विन पौर्णिमा हा आत्मविकासाचा संकल्प करण्याचा दिवस ठरू शकतो. शिक्षण घेताना चिकित्सक दृष्टिकोन स्वीकारणे, अफवांवर विश्वास न ठेवणे, व्यसनांपासून दूर राहणे, स्त्री-पुरुष समानतेचा आदर करणे, पर्यावरणाचे रक्षण करणे आणि सार्वजनिक प्रश्नांबाबत जबाबदार भूमिका घेणे ही धम्ममूल्यांची आधुनिक रूपे आहेत. सामाजिक माध्यमांवर मतभेद व्यक्त करताना अपमानास्पद भाषा न वापरणे, जातीय किंवा धार्मिक द्वेष पसरविणाऱ्या संदेशांना नकार देणे आणि सत्यापित माहितीच प्रसारित करणे हीदेखील सम्यक वाणीची आचरणातील उदाहरणे आहेत. अशा लहान कृतींमधून समाजात विश्वास आणि बंधुभाव वाढू शकतो.



आश्विन पौर्णिमेचा संदेश अखेरीस चंद्राच्या पूर्णत्वापेक्षा माणसाच्या विचारांतील परिपक्वतेशी अधिक जोडलेला आहे. बाह्य प्रकाशाचे सौंदर्य क्षणिक असू शकते; परंतु विवेक, करुणा आणि समतेचा प्रकाश समाजाच्या दीर्घकालीन परिवर्तनाला दिशा देऊ शकतो. वर्षावासातून मिळणारी शिस्त, पवारणेतील आत्मपरीक्षण, दानातून व्यक्त होणारी उदारता आणि धम्मातील प्रज्ञेचा मार्ग या सर्वांचा स्वीकार दैनंदिन जीवनात झाला, तर पौर्णिमेचे औचित्य अधिक अर्थपूर्ण ठरेल. व्यक्तीने स्वतःच्या चुका ओळखाव्यात, दुसऱ्यांचे म्हणणे ऐकावे, अन्यायाविरुद्ध विवेकपूर्ण भूमिका घ्यावी आणि सर्वांच्या प्रतिष्ठेचा आदर करावा, हा या दिवसाचा व्यापक संदेश आहे.


म्हणूनच आश्विन पौर्णिमा ही धम्माचरणाची नव्याने उजळणी करण्याची संधी म्हणून पाहिली पाहिजे. बुद्धांनी दाखविलेल्या प्रज्ञा, करुणा आणि मैत्रीच्या मार्गावर चालताना स्वतःच्या जीवनात नैतिकता रुजविणे आणि समाजात समतेचे वातावरण निर्माण करणे हेच खरे धम्मकार्य आहे. मनातील द्वेष कमी करून संवाद वाढविणे, भेदभावाऐवजी बंधुता स्वीकारणे आणि केवळ स्वतःच्या कल्याणाचा विचार न करता सर्वांच्या हितासाठी कार्य करणे, यातून आश्विन पौर्णिमेचा संदेश प्रत्यक्षात उतरू शकतो. चंद्राच्या प्रकाशाने उजळलेल्या रात्रीप्रमाणे मानवी जीवनही प्रज्ञेने उजळावे आणि प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगता येईल असा समाज घडावा, हीच या पौर्णिमेनिमित्त अपेक्षा आहे.

- सुजाता मोरे,
(लेखिका, बौद्ध धम्म व पर्यटन प्रशासनशास्त्राच्या अभ्यासक आहेत)
ईमेल – sujata.more2103@gmail.com



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
सोमवार, दि. २६ ऑक्टोबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



चोरीच्या घटना रोखण्यासाठी ग्रामसुरक्षा दल सक्रिय करा : गोपाळ पवार यांचे आवाहन

वालचंदनगर : दैनिक संध्या

आगामी दिवाळी सण-उत्सवांच्या काळात गावातील चोरीच्या घटना रोखण्यासाठी ग्रामसुरक्षा दल सक्रिय करावे, तसेच गावोगावी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, असे आवाहन वालचंदनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांनी केले. सध्या साखर कारखाने सुरू झाल्याने परिसरात ऊसतोड मजुरांच्या टोळ्या दाखल होत आहेत. या पार्श्वभूमीवर ऊसतोड मजुरांच्या मुकादमांची माहिती व संपर्क क्रमांक घ्यावेत, तसेच मजुरांची आवश्यक माहिती नोंदवून ठेवावी, असे मार्गदर्शन पोलिसांकडून करण्यात आले. आपल्या गावातील सुरक्षितता वाढविण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहावे. पोलीस पाटील व ग्रामसुरक्षा दलाच्या सदस्यांनी रात्रीच्या वेळी गस्त घालावी. गावात कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहनही पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांनी केले. सण-उत्सवांच्या काळात चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी ग्रामसुरक्षा दल, पोलीस पाटील आणि नागरिकांनी समन्वयाने काम करून पोलिसांना सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.



समाज सुसंस्कृत ठेवण्याची जबाबदारी महिलांवरही : ज्योत्स्ना चांदगुडे

पुणे : दैनिक संध्या

महिलांनी आपल्या कर्तृत्वाने स्वतःची प्रतिमा बदलली असून, आज प्रत्येक क्षेत्रात त्या नाव कमावत आहेत. मात्र, हे करताना समाजातील सुसंस्कृतपणा हरवता कामा नये. आपली संस्कृती आपणच जपायला हवी. समाज सुसंस्कृत ठेवण्याची आणि कुटुंबव्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी महिलांवरही आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक ज्योत्स्ना चांदगुडे यांनी केले. आदिश जैन फाउंडेशनच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नऊ महिलांना नवदुर्गा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नवी पेठेतील अक्षरवेल सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आदिश जैन फाउंडेशनच्या अध्यक्ष मृणाल जैन, म. भा. चव्हाण, श्रीपाल ललवणी, डॉ. दिलीप गरुड, राजश्री सोले, साधना शेळके, नंदा देवडीकर आणि नीता तुपारे उपस्थित होते. मनीषा नहार, कांचन सरोदे, अश्विनी कांबळे, मनीषा गोसावी, अंजली भिडे, बिजूबाई अडागळे, मोनिका महेकरे, डॉ. उज्ज्वला सहाणे आणि प्रियांका बोरा यांना या वेळी सन्मानित करण्यात आले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जिद्दीच्या जोरावर स्वतःची वेगळी वाट निवडणाऱ्या आणि त्यात यशस्वी ठरलेल्या या महिलांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. ज्योत्स्ना चांदगुडे म्हणाल्या, महिला कुटुंब सांभाळताना घरातील अर्थव्यवस्था, आरोग्य, शिक्षण अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडतात. आजची स्त्री घरासोबतच नोकरी आणि छंदही जोपासत आहे. मात्र, हे करताना मुलांवर चांगले संस्कार होतात की नाही, याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. मुलांच्या कपड्यांपासून ते लग्न आणि मूल नको, अशा मानसिकतेपर्यंतच्या बदलांचा विचार करण्याची गरज आहे. ॲड. प्रार्थना सदावर्ते म्हणाल्या, हा पुरस्कार सोहळा खऱ्या अर्थाने दुर्गोत्सव आहे. कठीण काळात कुटुंब सांभाळणाऱ्या महिला खऱ्या दुर्गा आहेत. त्यांनी प्रचंड कष्ट करून आपल्या कुटुंबाला प्रतिकूल परिस्थितीतून बाहेर काढले. मात्र, दुसरीकडे काही घटनांमुळे कुटुंबव्यवस्था धोक्यात येत असल्याचे दिसते. ही व्यवस्था सावरण्यासाठी महिलांनी आपल्यातील दुर्गा जागृत करून एकत्र आले पाहिजे. संघटित होऊन इतर महिलांमध्येही जागृती निर्माण करण्याची गरज आहे. मृणाल जैन यांनी प्रास्ताविक केले. उमा व्यास व वंदना घाणेकर यांनी सूत्रसंचलन केले. राजश्री सोले यांनी आभार मानले.

जेजुरीतील जनकल्याण संस्थेला नव्या रुग्णवाहिकेची गरज

पुरंदर : दैनिक संध्या

जेजुरी येथील जनकल्याण बहुउद्देशीय सामाजिक संस्थेची जुनी रुग्णवाहिका वारंवार नादुरुस्त होत असल्याने गरजू रुग्णांना वेळेत रुग्णालयात पोहोचविण्यात अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे संस्थेला नवीन रुग्णवाहिकेची तातडीने आवश्यकता असून, सामाजिक संस्था, दानशूर व्यक्ती, उद्योगसमूह आणि लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन मदत करावी, असे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नवनाथ चौंडकर यांनी केले आहे. सन २०१८ मध्ये नवनाथ चौंडकर यांच्या पुढाकारातून स्थापन झालेली ही संस्था जेजुरी शहर व परिसरात विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि लोककल्याणकारी उपक्रम राबवित आहे. जेजुरी हे महाराष्ट्रातील प्रमुख धार्मिक तीर्थक्षेत्र असल्याने येथे वर्षभर भाविक, प्रवासी आणि पर्यटकांची मोठी वर्दळ असते. या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांसह बाहेरून येणाऱ्या भाविकांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम संस्था करीत आहे. नागरिकांना आणि भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी संस्थेच्या माध्यमातून पाच मोफत जलशुद्धीकरण केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. तसेच जेजुरी व परिसरातील गरजू नागरिकांसाठी पाच मोफत धर्मादाय बाह्यरुग्ण विभाग चालविले जात आहेत. महिला बचत गटांना मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, भाविकांना मार्गदर्शन आणि वृद्धाश्रमांसाठी विविध उपक्रम अशा अनेक सामाजिक कार्यांतून संस्था आपली सामाजिक बांधिलकी जपत आहे. मोफत दवाखान्यात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना अधिक उपचारांसाठी पुढील रुग्णालयात तातडीने हलविण्याची वेळ अनेकदा येऊ शकते. अशा परिस्थितीत रुग्णवाहिका उपलब्ध असणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. मात्र, संस्थेकडे असलेली जुनी रुग्णवाहिका वारंवार बंद पडत असल्याने रुग्णांना वेळेत रुग्णालयात पोहोचविण्यात अडथळे निर्माण होत आहेत. यामुळे आपत्कालीन परिस्थितीत उपचार मिळण्यास विलंब होण्याची शक्यता आहे. जेजुरी परिसरातील नागरिकांसह येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना गरजेच्या वेळी आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी आणि कोणत्याही रुग्णाला केवळ रुग्णवाहिकेअभावी उपचारांसाठी विलंब सहन करावा लागू नये, यासाठी नवीन रुग्णवाहिका उपलब्ध होणे गरजेचे आहे.



पुरंदर मिल्कची २६वी वार्षिक सभा खेळीमेळीत

■ सासवड (दै. संध्या)

पुरंदरच्या शेतकऱ्यांसाठी गेल्या २६ वर्षांपासून दुधाला योग्य भाव देणारी आणि सातत्याने दूध संकलन करणारी एकमेव संस्था म्हणून नावलौकिक मिळवलेल्या पुरंदर मिल्क अँड ऍग्रो प्रो. लि. (खळद) ची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (ता.२५) खळद (ता.पुरंदर) येथील इग्लू कोल्ड स्टोअर व वेअर हौसिगमध्ये खेळीमेळीत पार पडली. या सभेत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक आणि माजी आमदार संजय जगताप यांनी संस्थेच्या भविष्यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प जाहीर केले.

यावेळी, दिवंगत लोकनेते चंदुकाका जगताप यांच्या दूरदृष्टीतून साकारलेल्या या संस्थेने शेतकऱ्यांच्या जीवनात मोठा बदल घडवला आहे. सभेला संस्थेचे अनेक सभासद उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना संजय जगताप यांनी संस्थेच्या यशस्वी वाटचालीची माहिती दिली. ते म्हणाले, "पुरंदर मिल्कने २६ वर्षात आजपर्यंत एकही दिवस दूध संकलन बंद ठेवले नाही, अनेक कंपन्या आल्या आणि गेल्या मात्र पुरंदर मिल्क भक्कमपणे उभी राहिली आहे ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

शेतकऱ्यांसाठी नव्या योजनांची घोषणा



चंदुकाकांनी घालून दिलेल्या आर्थिक शिस्तीमुळेच हे शक्य झाले आहे."

दरवर्षीप्रमाणे सभासदांना लाभांश म्हणून १ किलो तूप वाटप सुरू करण्यात आले आहे, ज्याची एकूण किंमत सुमारे ३६ लाख रुपये आहे. तसेच, गवळ्यांना १६ लाख रुपये बोनस देण्यात आला आहे. या उपक्रमांचा संस्थेच्या संस्थापिका व सासवडच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, माजी आमदार संजय जगताप, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, संत सोपानकाका सहकारी बँकेचे अध्यक्ष रमणिकलाल कोठडिया आणि इतर संचालक मंडळाच्या उपस्थितीत करण्यात आला. यावर्षी संस्थेने दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रीतून तसेच पेट्रोल पंप आणि कोल्ड स्टोअरेजच्या माध्यमातून एकूण ३९ कोटी ४९ लाख १९ हजार रुपयांचा व्यवसाय केला आहे. संस्थेचे भागभांडवल ५ कोटी १० लाख रुपये असून, राखीव निधी १८ कोटी ६६ लाखांचा आहे. यंदा संस्थेला ६ लाख ५५ हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र मांढरे यांनी, इग्लू कोल्ड स्टोअरेजमध्ये विविध फळे, फुले, धान्य आणि पल्प नियंत्रित तापमानात साठवता येतात, ज्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होतो असे सांगितले.

संचालक विठ्ठल मोकाशी यांनी प्रास्ताविक केले. या बैठकीला संचालक प्रदीप पोमण, केशव पुरंदरे, पांडुरंग कामथे, विकास जगताप, मोहन जगताप, अविनाश वाघोले, संजय ताकवले, त्रिंबक माळवदकर, शशिकांत दाते, संजय म. जगताप, शंकर कड, चंद्रशेखर जगताप, विलास जगताप, बाळासाहेब बहिरट, साजिद बागवान यांच्यासह जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, अजय इंगळे, डॉ. मनोज शिंदे, तुषार माहूरकर, सुनिता कोलते, शाहजहान शेख, उद्योजक प्रविण जगताप यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पुरंदर नागरीचे सरव्यवस्थापक अनिल उरवणे यांनी सूत्रसंचालन, कंपनी सेक्रेटरी संतोष जगताप यांनी अहवालाचे वाचन केले. रणजित जगताप, यशु जाधव, शरद कामथे, वर्षा तावरे, तुषार खळदकर, मारूती सुर्यवंशी आदी कर्मचाऱ्यांनी नियोजन केले.

संचालक प्रदीप पोमण यांनी सभासदांना १५ नोव्हेंबर पर्यंत खळद येथील डेअरीमध्ये तुपाचे वाटप होणार असल्याचे सांगत आभार मानले.

> संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेताना जगताप यांनी सांगितले की, सध्या ५,८०० मेट्रिक टन क्षमतेच्या असलेल्या इग्लू कोल्ड स्टोअरेजची क्षमता आणखी ३,००० मेट्रिक टनने वाढवण्यात येणार आहे. तसेच, दूध प्रक्रिया केंद्राचेही विस्तारीकरण केले जाणार आहे. सभासद व शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी लवकरच पुरंदर मिल्क संस्थेच्या अंतर्गत फार्मर प्रोड्युसर कंपनी मार्फत माहूर गावात ५ हेक्टर २० आर जागा घेऊन त्याठिकाणी सामुहिक गोठा, पशुखाद्य प्रकल्प आणि पिण्याच्या पाण्याचा प्रकल्प तसेच पुरंदरच्या दक्षिण भागात १२० एकर जमीन खरेदी करून तेथे फूड पार्क उभारण्यात येणार आहे. या बरोबरच संस्थेच्या सासवड येथील ७० गुंठे जागेत सदनिका बांधकाम प्रकल्प उभारण्यात येणार असल्याचे संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक माजी आमदार संजय जगताप यांनी सांगितले.

भाजप नेत्यांना राहुल गांधी फोबिया झालाय

■ पुणे (दै. संध्या)

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर टीका करण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक व्यासपीठावरील मौल्यवान वेळ खर्च करण्याऐवजी देशाच्या विकासाची कामगिरी, महागाई, बेरोजगारी आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर भाष्य करायला हवे होते, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केली आहे. भाजपच्या शीर्ष नेतृत्वाला राहुल गांधी यांचा फोबिया झाला आहे का, असा उपरोधिक सवालही त्यांनी उपस्थित केला. 'एनडीटीव्ही वर्ल्ड समिट' या आंतरराष्ट्रीय परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या विविध क्षेत्रांतील प्रगती, सरकारची कामगिरी आणि देशासमोरील आव्हानांवर अधिक भर देणे अपेक्षित होते. मात्र, या मुद्द्यांऐवजी त्यांनी आपल्या भाषणात राहुल गांधी यांच्यावर टीका करण्याला प्राधान्य दिले. राहुल गांधी यांना अपयशी आणि अनुत्पादक ठरविण्याचा प्रयत्न करताना पंतप्रधानपदाच्या प्रतिष्ठेचे भान राखले गेले का, असा प्रश्न तिवारी यांनी उपस्थित केला. राहुल गांधी खरोखरच अपयशी आणि अनुत्पादक असतील, तर पंतप्रधानांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठावर त्यांच्यावर टीका करण्यात एवढा वेळ का घालवावा? देशाच्या पंतप्रधानांनी विरोधकांवर टीका करण्याऐवजी स्वतःच्या सरकारची कामगिरी आणि देशाच्या विकासासाठी केलेले प्रयत्न जगासमोर मांडणे अधिक योग्य ठरले असते, असे तिवारी यांनी म्हटले आहे. महागाई, बेरोजगारी, अमेरिकेची वाढती दादागिरी आणि केंद्र सरकारवर विविध घटकांकडून होणारे आरोप अशा महत्त्वाच्या विषयांवर पंतप्रधानांनी भूमिका मांडणे आवश्यक होते. मात्र, विरोधी पक्षनेत्यावरील टीकेला प्राधान्य देणे हे राजधर्माला साजेसे नसल्याची टीका त्यांनी केली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत २०२४ मध्ये काँग्रेसच्या जागा वाढून १०२ झाल्या, तर भाजपच्या जागा ३०३ वरून २४० पर्यंत घसरल्या. या निकालातून जनतेने दिलेला संदेश भाजप नेतृत्वाने लक्षात घ्यावा, असे तिवारी यांनी नमूद केले.

हिंदू बांधवांच्या एकजुटीसाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा

- विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय अध्यक्ष आलोक कुमार यांचे मत
- अशोकजी सिंघल यांच्या जन्मशताब्दीनिमित्त हिंदू समरसता संगमचे आयोजन
- पारंपरिक वाद्य वादनाचा विश्वविक्रम; १,०५१ वाद्यांचा सहभाग

■ पुणे (दै. संध्या)



हिंदू संघटना अधिक मजबूत करणे आणि हिंदू बांधवांची एकजूट निर्माण करणे, हे श्रद्धेय अशोकजी सिंघल यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी समाजाने आणि विशेषतः तरुणांनी पुढाकार घेऊन एकत्र आले पाहिजे. हिंदू समाजातील स्वाभिमान जागृत करण्याचे आणि त्यांच्यामध्ये निर्भयता निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम अशोकजी सिंघल यांनी केले. त्यांनी राम मंदिराच्या आंदोलनाचा पाया रचला आणि त्यामुळेच आज अयोध्येत राम मंदिर उभे राहू शकले. त्यासाठी आपण त्यांचे आयुष्यभर ऋणी राहिले पाहिजे, असे मत विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय अध्यक्ष आलोक कुमार यांनी व्यक्त केले.

विश्व हिंदू परिषदेच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या वतीने श्रद्धेय अशोकजी सिंघल यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त हिंदू समरसता संगम या उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन स्वारगेट येथील श्री गणेश कला क्रीडा रंगमंच येथे करण्यात आले होते. त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून आलोक कुमार बोलत होते. या कार्यक्रमाला अशोकजी सिंघल जन्मशताब्दी वर्ष उद्घाटन समारोह समितीचे अध्यक्ष गजानन धरणे, श्री श्री १००८ आचार्य श्री स्वामी जितेंद्रनाथजी महाराज, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, ॲड. एस. के. जैन, विश्व हिंदू परिषदेचे प्रांत मंत्री किशोर चव्हाण, प्रांत सहमंत्री नितीन वाटकर, दिलीप कोटीभास्कर, धनाजी शिंदे, मातृशक्ती प्रमुख प्रिया रसाळ, दुर्गावाहिनी संयोजिका सोनाली नाथ, विभाग मंत्री संतोष अनगोलकर, दिनेश लाड, कार्यक्रम व्यवस्था सहप्रमुख करण घोडके व श्रीकांत चिल्लाळ उपस्थित होते.

आलोक कुमार म्हणाले, अशोकजी सिंघल यांनी आपले संपूर्ण आयुष्य हिंदू धर्मासाठी समर्पित केले. राम मंदिर निर्मितीचे त्यांचे स्वप्न पूर्ण झाले आहे. त्यांचे कार्य आणि विचार समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.

काळी आई वाचवायला हवी; तरच पुढची पिढी टिकेल

पद्मश्री राहीबाई पोपेरे; जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसच्या १३ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध पुरस्कारांचे वितरण

■ पुणे (दै. संध्या)

मी निसर्गाची आणि मातीची शाळा शिकले. गरीबी आली तरी लाजू नये आणि श्रीमंती आली तर माजू नये, हे मला वडिलांनी शिकविले. ती शिकवण मी लक्षात ठेवली. जे दिसायला चांगले आहे, ते आरोग्याला घातक आहे. आज आपण सगळे आरोग्याला घातक असलेले खात आहोत. त्यामुळे चारच भाज्या खा, पण आपले आरोग्य चांगले ठेवा. प्रत्येकाच्या ताटातून विषमुक्त भाजी जायला हवी. काळी आई अन्न देते, ती आपण वाचवायला हवी. तरच पुढची पिढी टिकेल, असे मत पद्मश्री राहीबाई पोपेरे यांनी व्यक्त केले.

न-हे मानाजीनगर येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस् च्या १३ व्या वर्धापनदिनानिमित्त पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन संस्थेच्या सभागृहात करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ संपादक विजय बाविस्कर, संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ.सुधाकरराव जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यंदाचा जीवनगौरव पुरस्कार माजी



खासदार, समाजसेवक प्रा. जोगेंद्र कवाडे यांना प्रदान करण्यात आला. तसेच पद्मश्री राहीबाई पोपेरे यांना कृषी क्षेत्रातील पुरस्कार, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे चे अध्यक्ष औदुंबर उकिरडे यांना शैक्षणिक क्षेत्रातील पुरस्कार, सिने अभिनेता मिलिंद शिंदे यांना कला क्षेत्रातील पुरस्कार, पुणे अर्बन को-ऑप बँकेचे अध्यक्ष निलेश ढमढेरे यांना सहकार क्षेत्रातील पुरस्कार आणि समाज प्रबोधन चॅरिटेबल ट्रस्टचे जयंत हिरे यांना सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुणेरी पगडी, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल असे पुरस्काराचे स्वरुप होते. जोगेंद्र कवाडे म्हणाले, जो संकटाशी दोन हात करण्याची तयारी ठेवतो, न डगमगता त्यावर मात करतो, त्याला कोणीही अडवू शकत नाही. शिस्त, समर्पण आणि दृढ निश्चय या तीन गोष्टी प्रत्येकाने लक्षात ठेवायला हवा. शिक्षक होणे ही साधी गोष्ट नाही. प्रत्येकाला वाटते माझा मुलगा डॉक्टर, इंजिनिअर झाला पाहिजे. पण निर्मिती करणारा शिक्षक व्हावे, हे कोणाला वाटत नाही. शिक्षक म्हणजे शिल्पकार असतो. घडविण्याची प्रक्रिया सोपी नाही.

औदुंबर उकिरडे म्हणाले, ग्रामीण भागातील माणसाने ठरवले तर तो काय करू शकतो, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे प्रा. डॉ. सुधाकरराव जाधवर आहेत. गोरगरीबांची मुले शिकली पाहिजेत आणि त्यांनी जीवनात पुढे गेले पाहिजे, या उद्देशाने आजही शिक्षण संस्था कार्यरत आहे, असेही त्यांनी सांगितले.

निलेश ढमढेरे म्हणाले, ज्या राज्यांमध्ये सहकार क्षेत्राचा विकास झाला, ती राज्ये आज प्रगतीपथावर आहेत. सहकारी बँकांच्या माध्यमातून समाजातील लोकांना काम करण्याची आणि पुढे जाण्याची संधी मिळायला हवी. समाजातील लोकांच्या आर्थिक गरजा भागविण्याचे महत्त्वपूर्ण काम सहकारी बँकांच्या माध्यमातून होते, असेही ते म्हणाले.

जयंत हिरे म्हणाले, समाजसेवा म्हणजे केवळ मदत करणे नव्हे, तर लोकांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणे होय. आपण किती मोठे झालो, यापेक्षा किती जणांच्या आयुष्यात आनंद निर्माण केला, हे अधिक महत्त्वाचे आहे.

> ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, समाजाला आपण काय देऊ शकतो, याचा अहोरात्र विचार करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान आज करण्यात आले. बल, बुद्धी आणि सद्विचारांतून शिक्षण या दृष्टिकोनातून संस्थेची तेरा वर्षांची वाटचाल सुरू आहे. ज्या भागात चौथीनंतर शिक्षणाची सुविधा नव्हती, अशा ठिकाणी प्रा. डॉ. सुधाकर जाधवर यांनी शाळा सुरू केली. आज या शाळेचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी संस्था नेहमीच प्रयत्नशील असते. अग्निशमन दल, पोलीस, पत्रकार, सैन्यदल आणि रुग्णवाहिका चालकांच्या मुलांना केजी ते पीजी पर्यंतच्या शैक्षणिक शुल्कात २५ टक्के सवलत तसेच ८५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणा-या विद्यार्थ्यांनी संस्थेत प्रवेश घेतल्यास शैक्षणिक शुल्कात १५ टक्के सवलत शिष्यवृत्ती पत्र यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.